रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार २० जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता



**मुंबई :** जुलै महिन्याचा उत्तरार्ध सुरू असतानाही राज्यात पावसाने जणू काही माघार घेतली आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण लक्षणीयपणे घटले आहे. गेल्या २४ तासांत मुंबईत केवळ एखादी सर अनुभवायला मिळाली असून मुख्यतः उन्हाचे चटके जाणवत आहेत. नागरिकांनी पावसासाठी आणलेल्या छत्र्यांचा वापर आता उन्हापासून बचावासाठी सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ के.एस. होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार सद्यस्थितीत जरी पावसाचा जोर ओसरलेला असला, तरी २४ जुलैपासून पुन्हा एकदा राज्यात पावसाच्या पुनरागमनाची शक्यता आहे. २४ जुलै ते ७ ऑगस्टदरम्यान मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकणात आगामी २४ तासांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

### अंतरंग

पोलीस ठाण्यातच मद्यपीने पोलिसाला मारले/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
इंग्लंडमध्ये वैभव सूर्यवंशीचा झंझावात/८

### पनवेलच्या चिपळे येथील नव्या पुलाचे लोकार्पण

# चौफेर विकासासाठी नियोजनबद्ध कामे

## ■ सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणारी सर्व कामे दर्जेदार असली पाहिजेत. जनतेसह वाहनचालक व प्रवाशांना येणाऱ्या अडचणी तातडीने सोडविल्या पाहिजेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्याच्या चौफेर विकासासाठी बांधकाम विभाग नियोजनबद्ध कामे हाती घेत आहे. सर्व प्रकारची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण करणे आणि त्यात गुणवत्ता राखणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केले. ते पनवेलमधील चिपळे येथील नव्या पुलाच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या चिपळे येथील पुलाचे लोकार्पण सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि. १९) झाले.

या सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, प्रल्हाद केणी, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, एकनाथ देशेकर, माजी सरपंच रमेश पाटील, शिवाजी दुर्गे, वासुदेव गवते, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, डॉ. रोशन पाटील, विश्वजित पाटील, मयूर कदम, गौरव कांडपिळे, सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, एस.एस. गांगुर्डे, कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, उपविभाग अधिकारी मिलिंद चव्हाण, सहाय्यक अभियंता प्रज्ञा पाटील, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. **(पान २ वर..)**

### लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर कणखर नेतृत्व

*लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासारखे कणखर नेतृत्व लाभल्यामुळे या तालुका आणि जिल्ह्याचा विकास रोखणे अशक्य आहे, असे गौरवोद्गार मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या वेळी काढले. पनवेल तालुका आणि रायगड जिल्हा हे आज झपाट्याने प्रगतिपथावर वाटचाल करत आहेत. या प्रगतीमागे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे खंबीर नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनविकासाभिमुख दृष्टिकोन असल्याचेही ना. भोसले यांनी अधोरेखित केले.*

## कोंडीचीवाडी येथील पुलाचेही उद्घाटन



**पनवेल :** तालुक्यातील कोंडीचीवाडी येथे गाढी नदीवर उभारण्यात आलेल्या मोठ्या पुलाचे उद्घाटन शनिवारी (दि. १९) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेलमधील विविध विकासकामांचे उद्घाटन झाले. त्यांनी चिपळे पुलाच्या उद्घाटनावेळी कोंडीचीवाडी पुलाचेही उद्घाटन करत असल्याचे सांगितले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सबका साथ सबका विकास या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरात प्रत्येक गाव व आदिवासीवाडी रस्त्याच्या माध्यमातून जोडली जात आहे. आज कोंडीचीवाडीला बांदेवाडीपासून जोडणाऱ्या पुलाचे उद्घाटन झाले याचा मनापासून आनंद आहे. यासाठी रायगडचे माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचेही आभार व्यक्त करतो. त्यांनी या विकासकामाला चालना दिली व चार कोटी रुपयांचा हा पूल इथे उभा राहिला आहे. **(पान २ वर..)**

# विधानसभेवेळी खेचाखेची आणि 'तू तू मैं मैं' झाले!

## उद्धव ठाकरे यांनी 'मविआ'वर फोडले खापर

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुका होऊन सात-आठ महिने झाले आहेत. त्यानंतरही या निवडणूक निकालावर चर्चा सुरू आहे. शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सामना दैनिकात दिलेल्या मुलाखतीत विधानसभेतील पराभवाचे खापर महाविकास आघाडीतील मतभेदांवर फोडले आहे. शिवसेना उबाठा नेते आणि खासदार संजय राऊत यांनी ही मुलाखत घेतली आहे.

लोकसभेत विजय आणि विधानसभेत पराभव झाल्याबद्दल संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारला. त्यावर ठाकरे यांनी सांगितले की, मतदारसंघ छोटा होतो तसतशी स्पर्धा वाढते. दोन तीन पक्ष एकत्र आल्यावर खेचाखेची सुरू होते. आम्ही महाविकास आघाडी म्हणून लोकसभेची पहिली निवडणूक लढवली. त्यावेळीही शिवसेनेने जिंकलेले मतदारसंघ सोडले. विधानसभेत शेवटपर्यंत खेचाखेची सुरू होती. त्याचा दुष्परिणाम असा झाला की, जनतेला वाटले यांच्यात आताच खेचाखेची आहे, तर नंतर काय?

### आपल्यातून मीपणा आल्याने पराभव

समन्वयाचा अभाव म्हणण्यापेक्षा लोकसभेचे यश सर्वांच्या डोक्यात गेले, असे सांगत शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, लोकसभेत महाविकास आघाडीत नेत्यापासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांमध्ये आपल्याला जिंकायचे आहे, हा आपलेपणा होता. विधानसभेत नाही नाही मला जिंकायचे आहे. हा आपल्यातून मीपणा आला तेव्हा पराभव झाला.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील फरक सांगताना उद्धव ठाकरे म्हणाले, लोकसभेत माझ्याकडे उमेदवार होते, जागा होती, पण निशाणी नव्हती. विधानसभेत निशाणी होती, पण जागा नव्हत्या. जागा कोणत्या हा प्रश्न होता. जागा मिळाल्या तर उमेदवारी कुणाला देणार हे निश्चित नव्हते. तू तू मैं मैं झाले. आपल्याकडून झालेली ही सर्वात मोठी चूक होती. लोकसभेला जे कमावले होते, ते विधानसभेला गमावले.

## आरेवारे समुद्रात बुडून चौघांचा मृत्यू

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

आरेवरे समुद्र किनारी फिरण्यास गेलेल्या चार जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि.१९) घडली. यात तीन महिला व एका पुरुषाचा समावेश आहे.

मुंब्रा येथील उज्मा शामशुद्दीन शेख (१८) व उमेरा शामशुद्दीन शेख (२९) या दोघी नातेवाईकांकडे रत्नागिरीत आल्या होत्या. शनिवारी सायंकाळी त्या जैनब जुनैद काझी (२६) व जुनैद बशीर काझी (३०) यांच्यासोबत आरेवरे किनारी फिरायला गेल्या होत्या. पोहताना त्यांना बुडून मृत्यू झाला.

## आंबेनळी घाटात पुन्हा दरड कोसळली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात दरवर्षीप्रमाणे यंदाही दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पावसाच्या जोरदार सरींमुळे शनिवारी (दि.१९) पुन्हा दरड कोसळून वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.



गेल्या १४ दिवसांत या मार्गावर चार वेळा दरड कोसळली आहे. सुरुवातीला घाट चार दिवस बंद ठेवण्यात आला होता. १५ जुलैनंतर हलक्या वाहनांची वाहतूक सुरू करण्यात आली असली, तरी १५ ऑगस्टपर्यंत अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. शनिवारी दुपारी चिरेखिंड-बावली टोकजवळ दरड कोसळल्याने वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच प्रशासन व संबंधित अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जेसीबीच्या सहाय्याने दगड, माती बाजूला करण्यात आली आणि एकेरी मार्ग सुरू करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## निवडक

### हिंदू मुलींचे धर्मांतर; सहा राज्यांमध्ये १० जणांना अटक

**लखनऊ :** उत्तर प्रदेश पोलिसांनी शनिवारी (दि. १८) बेकायदा धर्मांतर करणाऱ्या एका रॅकेटचा पर्दाफाश केला. हे रॅकेट आयसिस पद्धतीने काम करत होते. मार्चमध्ये दोन बहिणी बेपत्ता झाल्याची तक्रार आग्रामध्ये नोंदवण्यात आल्यानंतर हा तपास सुरू झाला होता. या कारवाईत सहा वेगवेगळ्या राज्यांमधून १० जणांना अटक करण्यात आली आहे.

### आपच्या आमदाराचा राजीनामा, राजकारणालाच राम राम!

**चंदिगड :** पंजाबच्या खरार विधानसभा मतदारसंघातील आम आदमी पक्षाच्या आमदार आणि पंजाबी गायिका अनमोल गगन मान यांनी राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली आहे. याबरोबरच त्यांनी आमदार पदाचाही राजीनामा दिला आहे. २०२४ साली भगवंत मान यांनी त्यांना मंत्रिमंडळातून वगळले होते. त्यामुळे या निर्णयाची चर्चा होत आहे.

## गणेशमूर्तीकारांतर्फे मंत्री आशिष शेलार यांचा आज भव्य सत्कार

### पेणमधील तांबडशेत येथे सोहळा



**पेण : प्रतिनिधी**

पीओपी गणेशमूर्ती बनविणे व विक्री करणे यावरील बंदी मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच उठवल्याने मूर्तीकारांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामध्ये मोलाची भूमिका निभावणारे राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञानमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन हमरापूर विभाग गणेशमूर्तीकार उत्कर्ष मंडळाच्या वतीने रविवारी (दि. २०) सकाळी ११ वाजता पेण तालुक्यातील तांबडशेत येथे करण्यात आले आहे.

या सोहळ्यास भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सोहळ्याची जय्यत तयारी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे अध्यक्ष जयेश पाटील, सचिव राजन पाटील तसेच सर्व कमिटी सदस्य करीत आहेत.

पेण तालुक्यातून राज्य, देशासह जगभरात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती रवाना होत असतात. मध्यंतरीच्या काळात पीओपीवर बंदी आल्याने गणेशमूर्तीकारांवर आर्थिक संकट ओढवले होते. दरम्यान, नुकतीच न्यायालयाने हा बंदी उठवली. याबाबत राज्य सरकार मूर्तीकारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले होते. म्हणूनच या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र राज्य गणेश मूर्तीकार संघटनेचे अध्यक्ष अभय म्हात्रे यांनी सांगितले.

## 'स्पर्धा गोष्टींची' स्पर्धेची अंतिम फेरी उत्साहात

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्पर्धा गोष्टींची' या स्पर्धेची अंतिम फेरी शनिवारी (दि. १९) मोठ्या उत्साहात झाली. या स्पर्धेत एकूण १०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

पनवेल शहरातील गोखले सभागृहात झालेल्या या स्पर्धेला प्रमुख मान्यवर म्हणून माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप नेते श्रीनंद पटवर्धन, पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, सरचिटणीस अमित ओझे, प्रितम म्हात्रे, पवन सोनी, मंगेश अपराज, महिला मोर्चा अध्यक्ष रूचिता लोंढे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, रोहित जगताप, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, वैभव बुवा आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन युवा मोर्चाचे अनिमेष ओझे, रूद्र पाटील, अभि रिंगे, शिवराज बोबडे, प्रथम दासरी, आशुतोष पाटील, प्रथम ठाकरे, कोमल कोळी, अनिमेष पटवर्धन, आकाश गाडे, हिमांशु पाटील, निखिल जोगळेकर, हर्षल बहाडकर यांच्या वतीने करण्यात आले होते. **(पान २ वर..)**



# मच्छिमारांच्या अद्ययावत सोयीसुविधांसाठी राज्य शासन कटिबद्ध -मंत्री नितेश राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

मच्छीमार व्यावसायिकांचे हित तसेच त्यांना अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.



मच्छिमार संघटनांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, सहायक आयुक्त (बाजार) मनीष वळंजू, द मुंबई फ्रेश फिश डिलर्स संघटनेचे बळवंतराव पवार, महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे देवेंद्र तांडेल आणि अन्य संघटनांचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी या वेळी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले की, मुंबईच्या महात्मा जोतिबा फुले मंडईमध्ये मच्छिमार बांधवांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. येथील सोयीसुविधांबाबत मच्छिमार संघटनांकडून आलेल्या सूचनांवर सकारात्मक चर्चा करून उपाययोजना करण्यात येतील. याठिकाणी उत्तम दर्जाची मंडई उभी राहावी, यासाठी महापालिका प्रशासनाचे प्रयत्न सुरू असून, संघटनांनी मोर्चा काढू नये, असे आवाहनही या वेळी मंत्री राणे यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी म्हणाले, महात्मा जोतिबा फुले मंडईमध्ये मासेविक्रीसाठी आवश्यक मूलभूत बाबींसोबतच वाहनतळ, उद्वाहन, मलनिसारण, रॅम्प आदी विविध दर्जेदार सुविधा उपलब्ध केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरानुसारच ही मंडईसुद्धा आधुनिक बनवली जात आहे. मच्छिमार संघटनांच्या विविध मागण्यांचा विचार करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## नोकराने दागिने पळविले; खारघर पोलिसांनी केली मुद्देमालासह अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील घरकाम करणाऱ्या नोकराने घरातुन ४२,६०,००० रुपये किमंतीचे सोने,चांदी व डायंमडचे दागिने,व रोख रक्कमेसह पळुन गेलेल्या नोकरास खारघर पोलीस ठाण्याचे पथकाने शिताफिने जालौर, राजस्थान येथुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयातील १०० टक्के मालमत्ता हस्तगत करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

खारघर पोलीस ठाण्यात फिर्यादी यांनी त्यांचे घरात काम करणारा दौलत शैतान सिंग (वय २५) याने त्यांचे घरातील सोन्याचे, चांदीचे दागिने डायमंड व रोख रक्कम अशी चोरी करून पळुन गेल्याची फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. नमुद दाखल गुन्हयाचे



तपासकामी पोलीस निरीक्षक सुरज पाटील, (गुन्हे), पोलीस उप निरीक्षक सुरज जाधव, हवालदार सुरेश कासार, नाईक मच्छिंद्र खेडकर, शिपाई अविनाश मोरे, सीडीआर एसडीआर विश्लेषक पोहवा वैभव शिंदे यांचे पथक आरोपीच्या राहत्या पत्तावर गेले होते.त्यानुसार सिरोही राजस्थान येथे पाळत ठेवली होती, परंतु आरोपी लोकेशन बदलुन वावरत होता. त्याला हिमाचल येथे पकडण्यासाठी दुसरे पथक रवाना करण्यात आले होते. आरोपीचे लोकेशन जालौर, राजस्थान येथे आल्याने या पथकाने त्यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली. या वेळी त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार गुन्हयातील चोरी केलेले दागिने व रोख रक्कम अशा मुद्देमालासह त्यास ताब्यात घेण्यात आले आहे.

## निवडक

### तलावात बुडून पर्यटकाचा मृत्यू

**चौक** : मुंबईहून पावसाळी पर्यटनास आलेल्या एका पर्यटकाचा खालापूर तालुक्यातील लोधीवली येथील पाझर तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. १८) घडली. सुनील मोरे (वय ४७, रा. गोवंडी) असे मयत पर्यटकाचे नाव आहे. मुंबईतील गोवंडी, चेंबूर येथून १२ पर्यटक शुक्रवारी लोधीवली येथील पाझर तलावात मौजमजा करण्यास आले होते. यातील सुनील मोरे यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. चौक पोलीस दूरक्षेत्र आणि हेल्प फाऊंडेशनने सुनील मोरे याचे शव तलावातून शोधून काढून सापडले. याबाबत आकस्मित मृत्यू अशी नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

### डॉक्टरांची फसवणूक

**पनवेल :** भरघोस परताव्याच्या आमिषाने १६ लाख रुपयांची एका डॉक्टराची फसवणूक झाल्याची घटना नावडे येथे घडली आहे. नावडे येथील एका डॉक्टरला ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारामध्ये अज्ञात व्यक्तीने नफ्याचे आमिष दाखवून त्यांची १६ लाख २१ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.

### करंजाडे वसाहतीमध्ये घरफोडी

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमधील दोन ठिकाणी चोरट्याने दोन ठिकाणी केलेल्या घरफोडीत रोख रकमेसह इतर वस्तू चोरून नेल्याची घटना घडली आहे. हरी कृष्ण बिल्डिंगमध्ये राहणारे वंदना डोळस व मनोहर मोहिते यांच्या घराचे लॉक तोडून चोरट्याने आत प्रवेश करून कपाट फोडून जवळपास २० हजार रुपयांची रक्कम लंपास केली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### पद आणि गोपनीयतेची शपथ

**नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये (एमपीएससी) डॉ. दिलीप पाटील भुजबळ यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी आज पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. आयोगाचे अध्यक्ष रजनीश सेठ यांनी भुजबळ यांना आयोगाच्या बेलापूर येथील मुख्यालयात शपथ दिली. या वेळी आयोगाचे सदस्य सवश्री अभय वाघ, सतिश देशपांडे, राजीव निवतकर, महेंद्र वारभुवन यांच्यासह आयोगाचे सहसचिव अवताडे उपस्थित होते.

## लॉ कॉलेजच्या अधीक्षकाची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

शेअर मार्केटमध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवून दहा लाख २० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अद्रिका शर्मा आणि मेघल शहा या दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणूक झालेले फिर्यादी हे लॉ कॉलेजमध्ये कार्यालय अधीक्षक आहेत.

मे महिन्यात त्यांना अद्रिका शर्मा यांनी शेअर मार्केट गुंतवणूक बाबत माहिती दिली व त्यांना व्हॉट्सअप ग्रुपमध्ये सामील केले. त्यांना लिंक पाठवून ॲप डाऊनलोड करण्यास सांगून माहिती भरली. त्यानंतर रक्कम भरण्यास सांगितले. त्यांनी अद्रिका यांच्या सांगण्याप्रमाणे कंपन्यांचे शेअर खरेदी केले आणि नफा मिळत असल्याचे दिसून आल्यानंतर विक्री केली. त्यांना मेघल शहा यांनीदेखील लिंक पाठवली असे १० लाख २९ हजार रुपये दोघांना पाठवले. त्यांनी गुंतवलेली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, मात्र ३० टक्के रक्कम जमा करण्यास सांगितल्यानंतर त्यांनी रक्कम भरली नाही. जून महिन्यात ते खात्यातून पैसे काढण्यासाठी गेले असता खात्याचा सायबर गुन्ह्यात समावेश असल्याने ते फ्रिज झाल्याची माहिती बँकेकडून मिळाली.

## मद्यपीने पोलिसाला मारले

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्यरात्री बारमध्ये धिंगाणा घालणाऱ्याला पकडून पोलिस ठाण्यात आणले असता त्याने पोलिसालाच मारहाण केली. स्वतःला वरिष्ठ निरीक्षकाच्या दालनात स्वतःला बंदिस्त करून घेण्याचाही त्याने प्रयत्न केला. यादरम्यान पोलिस कर्मचारी आणि मद्यपीत बराच वेळ झटापट सुरू होती. अखेर त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आले.




सीबीडी सेक्टर ११ येथील मॅग्रम बारमध्ये गुरुवारी पहाटे दीडच्या सुमारास भांडण सुरू असल्याची तक्रार पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सीबीडी पोलिसांच्या पथकाने बारमध्ये जाऊन पाहणी केली. या वेळी सतबिरसिंग संधू (वय ३१) हा मद्यधुंद अवस्थेत बारच्या मॅनेजरला मारहाण करत होता. संधू याने सिगारेट पेटवण्यासाठी माचीस मागितली असता ती देण्यावरून दोघांमध्ये वाद झाला होता. यामुळे पोलिसांनी संधू याला पकडून पोलीस ठाण्यात आणले होते. त्या ठिकाणी तो बसलेला असता पोलिस अधिकारी व कर्मचारी त्याच्याकडे चौकशी करत होते. संधू याने त्यांच्या अंगावर धावून जाऊन पोलिस नाईक अनिकेत घाडगे यांच्यावर ठोशाने व हातातल्या लोखंडी कड्याने हल्ला केला.

यानंतर वरिष्ठ निरीक्षकांच्या दालनात घुसून स्वतःला बंदिस्त करून घेण्याचाही त्याने प्रयत्न केला. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करून त्याला ताब्यात घेतले. दरम्यान त्याने पोलिसांवर केलेल्या हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## खारघरमधून दुचाकीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

केंद्रीय वस्तू व सेवा कर व केंद्रीय उत्पाद शुल्क विभागातून सेवानिवृत्त झालेल्या खारघर येथील कर्मचाऱ्याची खारघर रेल्वे स्टेशनच्या बाहेर पार्क केलेली दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली असून याबाबत खारघर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल केला असून पोलिस शोध घेत आहेत.

खारघर सेक्टर २३ येथे राहत असलेले उमाशंकर लाल हे केंद्रीय वस्तू व सेवा कर व केंद्रीय उत्पाद शुल्क या विभागात काम करीत होते. सध्या उमाशंकर हे सेवानिवृत्त झालेले आहेत. उमाशंकर यांना नुकताच बोरीवली येथे वैयक्तिक कामासाठी जायचे असल्याने त्यांच्या मालकी असलेल्या होंडा कंपनीची ॲक्टिव्हा कंपनीची दुचाकी ही खारघर रेल्वे स्टेशन परिसरात मोकळ्या जागेत पार्किंग करून रेल्वेने बोरिवली येथे गेले होते.

काम उरकून पुन्हा पार्क केलेल्या दुचाकीजवळ आले असता त्यांची दुचाकी सापडली नाही. त्यावेळी आपल्या दुचाकीची चोरी झाल्याचे लक्षात येताच उमाशंकर यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## कामोठे प्रभागात उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुंदर पनवेल, हरित पनवेल' या संकल्पनेखाली पनवेल महानगरपालिकेच्या उद्यानविभागार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे. प्रभाग समिती क अंतर्गत सेक्टर ३१, जुना एसटीपी परिसर, कामोठे येथे उद्यान विभागामार्फत गुरूवारी वृक्षारोपण करण्यात आले.




पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि डॉ.अरुण भगत (माजी नगर सेवक), रॉबिनहूड आर्मीचे हंसराज वर्मा, निसर्गप्रेमी संस्थेचे सुनील करपे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी कामोठे येथील सेक्टर ३१, जुना एसटीपी परिसर, कामोठे येथे वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमांतर्गत सेक्टर ३१ जुना एसटीपी परिसरात अर्जुन, बेहडा यासारखी औषधी वनस्पती व जांभूळ, आवळा ही फळझाडे व इतर विविध १५० वृक्षांचे लागवड करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रम डॉ.अरुण भगत (माजी नगरसेवक), रॉबिनहूड आर्मीचे हंसराज वर्मा, निसर्गप्रेमी सुनील करपे, शुभांगी सुरेश खरात व इतर स्थानिक नागरीकांच्या उपस्थितीत पार पडले.

सहा.आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक मांगीलाल जाधव, सहा.उद्यान पर्यवेक्षक कुणाल राठोड यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

## रामकी फाऊंडेशनतर्फे घोट हायस्कूलला कॉम्प्युटर लॅब

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सद्गुरू वामनबाबा माध्यमिक विद्यालय, घोट हायस्कूल येथे रामकी फाऊंडेशन, तळोजा प्लांट यांच्या सौजन्याने सुसज्ज कॉम्प्युटर लॅब उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने रामकी फाऊंडेशनचे प्रोजेक्ट हेड सोमनाथ मलगर यांचा सत्कार शाल श्रीफळ व शाळेचे सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.



या वेळी श्री सोमनाथ मलगर साहेब यांनी पुढील काळातही शाळेसाठी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला रामकी फाऊंडेशनचे रवीशंकर, रमी रेड्डी (हैदराबाद), सीएसआर प्रमुख सतेज धीवर, घोट गावचे माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैभव भोईर, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षणतज्ज्ञ सदस्य विठ्ठल भाऊ वाव्हळे, रोशना ठाकूर उपस्थित होते.

वाव्हळे यांनी शाळेतील मुलांना मार्गदर्शन केले तसेच पाहुण्याचे विशेष आभार मानले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक संदेश कुमार पाटील, शिक्षिका सरिता म्हात्रे गावंड, स्वानंदी पाटील, देविदास अंभोरे यांचाही कार्यक्रमात सक्रिय सहभाग होता.

सुत्रसंचालन नितीन भोईर यांनी केले. या संगणक लॅबमुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची मोठी संधी मिळणार असून, ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रगतीसाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार आहे.

## सरकारी रुग्णालयात चार डायलिसीस मशिन्सचे लोकार्पण

**अलिबाग : प्रतिनिधी**

आयडीबीआय बँकेने आपल्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत रायगड जिल्हयातील चार शासकीय रूग्णालयांना डायलिसीस मशिन्स उपलब्ध कूरन दिल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांच्या उपस्थितीत या मशिन्सचा लोकार्पण सोहळा झाला.



सध्या जिल्हयातील रूग्णांना डायलिसीसची गरज मोठया प्रमाणावर आहे. रूग्णसंख्येच्या तुलनेत उपलब्ध मशिन्स कमी पडत आहेत. अशा वेळी आयडीबीआय बँकेने एकाच वेळी चार मशिन्स उपलब्ध करून दिल्याने रूग्णांची मोठी गैरसोय टळणार आहे. याचा उपयोग जिल्हाभरातील रूग्णांना होणार असल्याचे जिल्हाधिकारी जावळे या वेळी म्हणाले. जिल्हयातील रूग्णालयांमध्ये आणखी काही डायलिसीस मशिन्स उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हयात सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत आयडीबीआय बँकेने राबवलेल्या उपक्रमांची माहिती या वेळी बँकेचे झोनल हेड रंजन कुमार रथ यांनी दिली.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. निशिकांत पाटील, आयडीबीआय बँकेचे झोनल हेड मुंबई रंजन कुमार रथ, रीजनल हेड सुधांशु कुलकर्णी, शाखाधिकारी निखिल सिन्हा आदी उपस्थित होते.

पान १ वरून

### चौफेर विकासासाठी नियोजनबद्ध कामे

राज्यातील रस्ते, पूल आणि इतर सार्वजनिक बांधकामे वेळेत पूर्ण करून जनतेला दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सतत प्रयत्नशील असून ही कामे दर्जेदार आणि नागरिकांना उपयोगी ठरणारी असावीत, असे प्रतिपादन मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केले.

नेरे–माळडुंगे मार्गावरील चिपळे नवीन पूल सुरू झाल्यामुळे परिसरातील गावांमधील नागरिकांसाठी वाहतुकीची मोठी सुविधा निर्माण झाली असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला या पुलामुळे चालना मिळेल, असेही मंत्री मंत्री महोदयांनी सांगितले.

सन १९७५ साली बांधण्यात आलेल्या नेरे–माळडुंगे मार्गावरील चिपळे पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असते. या पुलाचे आयुर्मान जवळपास ५० वर्षे होते, मात्र २००५मध्ये आलेल्या पुराचा मोठा तडाखा या पुलाला बसला आणि पुलाचे नुकसान झाले होते. पूल खचण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे या पुलाची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांडून होत होती. भविष्यात मोठा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता व्यक्त होत होती. पूल धोकादायक झाल्याने तात्पुरती डागडुजी उपयोगाची नसल्याने यावर योग्य पर्याय म्हणून त्या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून नवीन पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने अर्थसंकल्पीय निधीतून १० कोटी रुपये खर्च करून या पुलाची उभारणी झाली.

या पुलाचा वापर नेरे, चिपळे, वाजे, गाढेश्वर, धोदाणी, माळडुंगे या परिसरात जाण्यासाठी केला जातो. हा पूल जवळपास ६६ मीटर लांब, १२ मीटर रुंद आहे. वाहतुकीच्या दृष्टिकोनातून या पुलाच्या सुविधेमुळे प्रवासी, वाहनचालक आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून या विकासकामासाठी सतत प्रयत्न केल्याबद्दल नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहे.

### कोंडीचीवाडी येथील पुलाचेही उद्घाटन

कोंडीचीवाडी येथील पुलाच्या उद्घाटन समारंभाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उपाध्यक्ष संजय पाटील, तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं.स. सदस्य राज पाटील, प्रल्हाद केणी, अंकुश पाटील, दिनेश खानावकर, रमेश पाटील, कृष्णा पाटील, धनाजी पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, वाजे ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र भालेकर, माळडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरमुडे, माजी उपसरपंच काळुराम वाघे, जोमा निरगुडे, पद्माकर चौधरी, चाहूशेठ चौधरी, ग्रामपंचायत सदस्य उषा वारगडा, माजी ग्रामपंचायत सदस्य तनुजा दोरे, चिपळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, राजेश भोईर, नारायण मढवी, कमळ चौधरी, किसन चौधरी, विकास भगत, हर्षदा चौधरी, विष्णू सपरा, श्याम भालेकर, विष्णू पारधी, माही कडवी, लक्ष्मण चौधरी, गणेश शीर, दिलीप पाटील, किसन चौधरी, कमळू चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### स्पर्धा गोष्टींची स्पर्धेची अंतिम फेरी उत्साहात

इयत्ता पाचवी ते दहावी अशा गटात झालेल्या या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्याला प्रत्येकी तीन हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये, तृतीय एक हजार रुपये, तर उत्तेजनार्थ पारितोषिकास पाचशे रुपये आणि सर्व बक्षीसपात्र विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र असे बक्षिसांचे स्वरूप होते. संतांची कथा, बोधकथा, अकबर बिरबल कथा व इसापनीतीच्या कथा या विषयावर ही स्पर्धा झाली.

विविध गटात झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक अथश्री जोशी, तारुण्य बीडवी, महेंद्र पोहराम, आर्या कडू, हिमांशू परमार; द्वितीय क्रमांक ध्रुव जाधव, अमर विश्वकर्मा, स्वरा भिसे, प्रिन्स वाकोडे, अधिशेष घुगरे; तृतीय क्रमांक चिन्मयी भिडे, पारस लुहार, आशियान अन्सारी, सोनाक्षी दालवाले, गौरी शिंदे; तर उतेजनार्थ पारितोषिक मयुरी काकोडिया, आर्यन प्रजापती, अबीर बावळे, राज सरोज आणि कनिष्का सुराते यांनी पटकावला. परीक्षक म्हणून प्रिती धोपाटे यांनी काम पहिले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.


## निवडक

### श्री साईबाबा मंदिरात चोरी

**पनवेल :** शहरातील तक्का येथील श्री साईबाबा मंदिरामध्ये अज्ञात चोरट्याने दानपेटीची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली असून सदर चोरी तेथे लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झालेली आहे. येथील श्री साईबाबा मंदिराचे लॉक तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून मंदिरातील दानपेटीतील रोख रक्कम अंदाजे सात हजार रुपये ही घरफोडी चोरी करून घेऊन गेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहाते घरातुन घरातुन कोणास काहीएक न सांगता एक इसम कोठेतरी निघुन गेला असुन तो परत घरी न येता कोठेतरी हरविला असल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



श्रीनाथ टिकाराम भंडारी, (वय ५० वर्षे), रा. व्हीआरपी नं. ३०, पंचशीलनगर झोपडपटटी, से. पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रंग ठि. रूम नं. १८, नवीन पनवेल , उंची ५ फुट ५ इंच, गोरा, नाक सरळ, केस काळे, अंगाने मध्यम, चेहरा उभट, अंगात नेसुन निळ्या रंगाचा टी शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट, सोबत मोबाईल फोन आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यानी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा सहा. पोलीस उपनिरीक्षक सुरेश कांबळे यांच्याशी संपर्क साधावा.

### सोन्याची चेन हिसकावली

**पनवेल :** बसमध्ये चढत असताना एका मुलींची सोन्याची साखळी हिसकावल्याची घटना पनवेल शहरातील बसस्थानक परिसरात उघडकीस आली. १० ग्रॅम वजानाची पन्नास हजार रुपये किमतीची ही सोनसाखळी असून, याप्रकरणी सदर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिंगारवाडी गाव येथे राहणारी एका १८ वर्षीय मुलगी पनवेल आयटीआयमध्ये फॉर्म भरण्यासाठी आली होती. यावेळी त्यानंतर पुन्हा घरी मामाच्या गावाला जाण्यासाठी पनवेल बस स्टॅन्डमध्ये खोपीली बसमध्ये ती महिला चढत असताना अज्ञाताने १० ग्रॅम वजानाची पन्नास हजार रुपये किमतीची ही सोनसाखळी हिसकावली. काही वेळानंतर साखळी चोरी झाल्याचे कळाले. त्यांनी तत्काळ पनवेल शहर पोलिसांना याची माहिती दिली.

### खारघरमध्ये विवाहितेचा छळ

**पनवेल :** खारघरमधील एका विवाहितेचा सासरच्या मंडळींकडून छळ झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना हरियाणा येथील अंबाला येथे घडली. यामध्ये विवाहितेच्या माहेरकडून घर आणि कार्यालय खरेदीसाठी ८४ लाख रुपये उकळले आणि तिला मारहाण केली. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात विवाहितेने नोंदवली. पीडितेचे ३ लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र आणि दागिने पतीने स्वतः कडेच ठेवले म्हटले आहे. पीडितेचे तीन लाख खारघर येथील विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार २०१९ ते मार्च २०२५ पर्यंत छळ केल्याचे आहेत. खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे हे तपास करीत आहेत.

### चोरीची रिक्षा हस्तगत

**पनवेल :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातून चोरलेली रिक्षा पनवेल शहर पोलिसांनी सराईत रिक्षा चोराकडून हस्तगत केली आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संतोष भोपी यांची ५०,००० रुपये किमतीची रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने या बाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करताच गुप्तबातमीदाराच्या मदतीने सुरू केला असता आरोपी अक्षय नरेश चव्हाण (वय २२, रा. काशीबाई झोपडपट्टी) याची माहिती मिळाली त्याला चोरीच्या रिक्षासह ताब्यात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतवार यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.



# कोंडीचीवाडीतील शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात होत असलेला विकास पाहून त्या विकास कामावर प्रभावित होऊन कोंडीचीवाडी येथील शेकापच्या कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (दि.१९) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

यामध्ये महादू भूकरे, काना दोरे धर्मा भूकरे, पद्या ठाकरे, महादू उधडा, कान्ह्या ठाकरे, अनंता दोरे, नारायण दोरे, ग्रा. पंच्या माजी सदस्या यमुना दोरे, शांती भूकरे, सोम्या भूकरे, गणपत ठाकरे, दामू उघडा अरुणा भूकरे, जानकी भूकरे आदी शेकापच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या पक्षप्रवेश सोहळ्याला उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे प्रदेश सदस्य अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य राज पाटील, वाजे ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र भालेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य तनुजा दोरे, ग्रामपंचायत सदस्य उषा वारगडा, माजी उपसरपंच काळूराम वाघे, जोमा निरगुडे, पद्माकर चौधरी, चाऊशेठ चौधरी, पत्रकार गणपत वारगडा, ग्रामपंचायतीचे सरपंच सिताराम चौधरी, उपसरपंच जनार्धन निरमुरे, चिपळेचे माजी सरपंच रमेश पाटील, राजेश भोईर, नारायण मढवी, कमळ चौधरी, किसन चौधरी, विकास भगत, हर्षदा चौधरी, विष्णू सपरा, श्याम भालेकर, विष्णू पारधी, माही कडवी, लक्ष्मण चौधरी, गणेश शीर, दिलीप पाटील, किसन चौधरी, कमळू चौधरी आदी उपस्थित होते.



**पनवेल : पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक के.डी.म्हात्रे, भाजप नेते अनेश ढवळे, माजी उपसरपंच योगेश लहाने, उद्योजक मनोज आंग्रे, राकेश म्हात्रे, विकी शेडगे, अभिजित मोरे, आरपीआयचे नेते अशोक निकम, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, उद्योजक राकेश पोटे, चैतन्य शेट्टी, संकेत देशमुख आदी उपस्थित होते. या वेळी निलेश पाटील यांनी घेतलेल्या नवीन गाडीचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पूजन केले.**

# मदतीच्या बहाण्याने एटीएम कार्डची अदलाबदल करून महिलेची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

मुलाच्या शाळेची फी भरण्यासाठी एटीएमवर पैसे काढण्यासाठी गेलेल्या एका महिलेची फसवणुक एका चोरट्याने केल्याची घटना उघडकीस आली ४० हजार रुपयांची फसवणूक आहे. कळंबोली पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

कळंबोलीत राहणाऱ्या वंदना कुलाळ यांना आपल्या मुलाच्या शाळेची फी भरायची होती. त्यामुळे त्या आपल्या पतीचे एटीएम कार्ड सुधागड शाळेजवळील कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये गेल्या होत्या. त्यांना एटीएम मशीनचा वापर करता येत नसल्याने एटीएमच्या बाहेर उभ्या असलेल्या एकाने मदत करण्याच्या बहाण्याने वंदना कुलाळ यांचे एटीएम कार्ड हातचलाखीने स्वतःजवळ ठेवले. त्यानंतर त्याने हुबेहूब त्याचसारखे कार्डचा वापर करीत त्यांच्याकडून पिन नंबर विचारून घेतला. त्यानंतर बहाणा करून तेथून पलायन केले.

या चोरट्याने दुसऱ्या एटीएम कार्डचा वापर करून ४० हजार रुपये काढून घेतले त्यानंतर त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पनवेलमध्ये पीडब्ल्यूडी कार्यालयाचे लोकार्पण

## मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते शुभारंभ

**मान्यवरांची उपस्थिती**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भिंगारी येथे असलेल्या पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचा लोकार्पण सोहळा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

महायुती सरकारच्या माध्यमातून राज्यभरात विविध विकास कामांना चालना दिली जात आहे. यामध्येच पनवेल विधानसभा क्षेत्रात आज कोट्यवधी रुपयांच्या कामांचे उद्घाटन मला करताना आनंद होत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने ही कामे मुदतीच्या वेळेआधीच केल्याने मी अधिकाऱ्यांचे कौतुक करतो, असे प्रतिपादन यावेळी सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी व्यक्त केले.

पनवेलकरांच्या दृष्टिकोनातून आज महत्त्वाचा दिवस आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत आज कोट्यावधी रुपयांच्या विकास कामांची उद्घाटन पनवेल विधानसभा मतदारसंघात होत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा शिवेंद्रराजे भोसले पुढे नेत आहेत त्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध विकास कामांना चालना मिळाली आहे, असे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उद्घाटनावेळी व्यक्त केले.

शासकीय विभाग असला तरी या शासकीय इमारतीला कॉर्पोरेट कार्यालयाचा लुक सार्वजनिक बांधकाम खात्याने दिला आहे त्यामुळे आता शासकीय कार्यालय आपली कुस बदलत आहेत, असे मत या उद्घाटनावेळी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केले.

या कार्यालयाच्या उद्घाटनावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागीय अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक अमोघ ठाकूर, भार्गव ठाकूर, पी.पी खारपाटील, मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, दिनेश खानावकर, सुमित झुंजारराव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर, अनेश ढवळे, योगेश लहाने, यांच्यासह अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वृद्धेच्या दागिन्यांची लूट

**पनवेल :** कामोठे येथे वृद्ध व्यक्तींची फसवणूक करणाऱ्या टोळीने पनवेलमधील वृद्धांना आपले लक्ष्य केले आहे. हातचलाखी करून चोरट्यांनी ८३ वर्षीय वृद्धेचे ७५ हजार रुपयांचे दागिने लांबवले. ही घटना गणेश मंदिराजवळ घडली आहे. दोन व्यक्तींनी रस्त्यावरून जाणाऱ्या ८३ वर्षीय वृद्धेला थांबवून पेपर वाचला का चोरट्यांचा सुळसुळाट झाल्याचे सांगितले. या वेळी या वृद्धेच्या २.५ तोळे सोन्याच्या बांगड्या लुबाडून चोरटे पसार झाले. या वृद्धा शहरातील साईनाथ हेरीटेज या इमारतीमध्ये राहतात. सकाळी त्या गणेश मंदिराकडे जात असताना ही घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.



**पनवेल : भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल अरुणशेठ भगत यांचे कुंभार समाज तालुकाध्यक्ष बजरंग भागवत यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# रामशेठ ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर-ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि.१९) विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

सेवा सहयोग फाऊंडेशन, मुंबई आणि टीआयएए ग्लोबल कपॅबलिटीस यांच्या मार्फत वेगवेगळे प्रकल्प वेगवेगळया जिल्हयांमध्ये राबविले जातात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे या हेतूने सहयोग फाऊंडेशन मार्फत विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन केले जाते.

या प्रदर्शनात विद्यालयातील आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित ज्या काही संकल्पना आहेत. या विज्ञान प्रदर्शनास सर्व विद्यार्थ्यांचे पालक, विज्ञान प्रेमी ग्रामस्थ व रायगड जिल्हा परिषद शाळा - ओवेपेठ मराठी माध्यमाच्या पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनाचा लाभ घेतला.

या विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व भाजप पनवेल तालुका उत्तर मंडळ उपाध्यक्ष प्रभाकर जोशी साहेब व सखी सावित्री समिती सदस्या सुजाता जोशी मॅडम यांच्या हस्ते सर्व शिक्षक व पालक यांच्या उपस्थितीत झाले.

या विज्ञान प्रदर्शनासाठी सेवा सहयोग फाऊंडेशन, मुंबई यांचे विज्ञान प्रशिक्षक जयश्री सानप, भाग्यश्री पाटील, व सहाय्यक प्रशांत उप्पर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य लाभले. या विज्ञान प्रदर्शनाचे योग्य नियोजन विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभाग प्रमुख स्वप्नाली पवार, सहाय्यक शिक्षक अभिजित जोगडदंडे, संभाजी जाधव यांनी केले होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी

**खारघर : रामप्रहर वृत्त**



खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१९) प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टीचे आयोजन केले होते.

महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या वेळी वेगवेगळी नृत्ये, गीते तसेच वेगवेगळे गेम्स सादर करून त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले. या वेळी वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाचा आर्यन भटोसे याला मिस्टर फ्रेशर्स तसेच विज्ञान शाखेतील प्रथम वर्षाची आलिया ठाकूर हिला मिस फ्रेशर्स म्हणून निवडले. प्रा. रिजवाना मोमीन व रुद्रतेज शेट्टी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या फ्रेशर्स पार्टीचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सर्व प्राध्यापक वृंद या सर्वांचे अभिनंदन केले.

या फ्रेशर्स पार्टीचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा व प्रा. विशाल देशमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. शिवानी मानकाने, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. शिवानी सोनकर, प्रा. शुभांगी ठाकूर, प्रा. करिष्मा कडव आदींनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# सीकेटी कॉलेजमध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणासंदर्भात कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागा तर्फे शनिवारी (दि.१९) भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि मानवता विद्याशाखा प्रमुख प्रो. डॉ. बी .एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेलचे वरिष्ठ अधिकारी अरविंद मोरे यांनी अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण या विषयावर मार्गदर्शन केले.

भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण या कार्यक्रमध्ये भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण हे का? केव्हा? आणि कोणत्या कारणामुळे झाले. तसेच सध्या व्यावसायिक बँकांसमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय या वेगवेगळ्या मुद्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागाच्या एकूण ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

भारतातील व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण या आयोजित कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.बी.डी.आघाव, यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. के. एन ढवळे यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एच. एस खरात आणि कार्यक्रमाचे आभार प्रो.डॉ बी .एस. पाटील यांनी मानले, तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. के. बी. ढोरे, प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे (शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल) यांनी विशेष सहभाग घेतला.

# सेलिब्रेशन असावे ते ‘शोले’ पन्नाशीचे...



झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

मिनर्व्हा चित्रपटगृह... दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावर (लॅमिन्टन रोड) किमान तीन पिढीतील चित्रपट रसिकांची अफाट गर्दी. ट्रॅफिक जाम झालाय. एकेक करत ‘शोले’तील कलाकार आपल्या प्रशस्त गाडीतून येताहेत. ते गाडीचा दरवाजा उघडण्यापूर्वीच जगभरातील मीडियाचे कॅमेरे आणि बूम त्यांच्यावर खिळलेत. प्रत्येकाला भावना अनावर




झाल्या आहेत. फ्लॅशबॅकमध्ये जात त्यांना पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणीत जायचयं. अनेक प्रादेशिक भाषा व हिंदी, इंग्रजी वृत्तवाहिन्यांवर हे सगळेच उत्फूर्त कव्हरेज लाईव्ह दाखवताहेत. भरभरून टीआरपी मिळतोय. मिनर्व्हावर प्रचंड मोठी सजावट केली आहे. लेझर शो सुरू आहे. आकर्षक असे थिएटर डेकोरेशन आहे. गर्दीतील साठी-पासष्टी ओलांडलेल्या चित्रपट रसिकांना कॅमेर्‍यासमोर बोलते केले जात आहे. या उत्साहात आज हयात नसलेल्या संजीवकुमार, अमजद खान, ए. के. हनगल, लीला मिश्रा, विजू खोटे, मॅकमोहन, जगदीप अशांचा अजिबात विसर पडलेला नाही. मिनर्व्हाच्या भव्य दिमाखदार पडद्यावर सत्तर एमएम व स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीमचा दबदबा कायम आहे. पडद्यावर संवाद सुरू होण्यापूर्वीच पब्लिकमधून डायलॉगबाजी सुरू होतेय, कितने आदमी थे...

‘शोले’चे पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताचा सेलिब्रेशन हे असे झाले असते तर... आज मी मिनर्व्हावरून जातो तेव्हा त्याची ती १४९९ अशी अफाट आसन क्षमता असलेली देखणी इमारत पूर्णपणे पाडलेली दिसते. अवतीभवती पत्रे लावलेत तरी मला यह दोस्ती हम नहीं तोडेंगे असा वीरू व जय यांच्या दोस्तीचा आनंद ऐकायला मिळतो... अब गोली खा, अशी गब्बरसिंगची दहशत तेथे जाणवते. यश, यश म्हणतात ते हेच असते.

सिप्पी फिल्मकडून म्हणा अथवा फिल्म हेरिटेज फाउंडेशनकडून म्हणा, ‘शोले’चे पन्नास वर्ष पूर्णतेचे जंगी सेलिब्रेशन याच मिनर्व्हा चित्रपटगृहात दणक्यात साजरे झाले असते. जगभरातून हिंदी चित्रपट रसिक त्यासाठी नक्कीच आले असते.

१५ ऑगस्ट १९७५ रोजी मुंबईत प्रदर्शित झालेला जी.पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित ‘शोले’ नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, बंगाल व हैदराबाद (निझाम) येथे शुक्रवार २२ ऑगस्ट १९७५ रोजी आणि मग त्या काळातील पद्धतीनुसार टप्प्याटप्प्याने लहान मोठ्या शहरांपासून ग्रामीण भागातील चित्रपट रसिकांपर्यंत चित्रपट पोहचला. शोले न पाहणारा चित्रपट रसिक त्या काळात मिळणे महामुश्किल. शोले जणू या देशाची लोककथा झाला. पन्नास वर्ष पूर्ण निमित्ताने आता १५ ऑगस्ट २०२५ रोजी आयनॉक्स मल्टीप्लेक्समध्ये पुन्हा अतिशय थाटात शोले प्रदर्शित होतोय. आता त्यात आणखी काही दृश्ये समाविष्ट केली आहेत. चित्रपट निर्मितीत काही दृश्य चित्रपटात समाविष्ट करता येत नाहीत (लांबीचा विचार करावा लागतो. कधी सेन्सॉर काही दृश्य कापते. अशी अनेक कारणे असतात. तो विषयच वेगळा) अशी अनेक दृश्य आता शोलेमध्ये पहायला मिळणार या गोष्टीचे आतापर्यंत हजार वेळा शोले पाहिलेला माणूस ही स्वागत करेल. पन्नास, शंभर वेळा शोले पाहणारे फिल्म दीवाने बरेच आहेत. ते आता आणखी अनेकदा शोले एन्जॉय करतील. आवडलेला चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय करणे हेदेखील एक चित्रपट रसिकांचे वैशिष्ट्य. शोलेसारखे चित्रपट ते अधोरेखित करतात.




शोले पन्नास वर्ष सेलिब्रेशला सुरुवात कुलाब्यातील रिगल चित्रपटगृहातील एका विशेष खेळाने झाली. काही महिन्यांपूर्वीचीच ही गोष्ट. पटकथाकार व संवाद लेखक सलिम जावेद यांच्यावरील माहितीपटाच्या निर्मितीच्या निमित्त शोलेचा हा खास खेळ फिल्म हेरिटेज फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आला आणि शोच्या दोन अडीच तासापूर्वीच रिगलबाहेर शोले प्रेमींची लांबलचक रांग लागली. याच रांगेत मला संगीतकार कौशल्य इनामदार आपल्या मुलासह भेटले. आपण अनेकदा शोले अनुभवलाय. आज खास मुलाला दाखवायला घेऊन आलोय, ते मला भेटताक्षणीच म्हणाले. या खेळास सलिम जावेद यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. पडद्यावर सेन्सॉर प्रमाणपत्र दिसताच हाऊसफुल्ल गर्दीतील शोलेप्रेमींनी प्रचंड टाळ्या शिट्ट्यांनी रिगल डोक्यावर घेतले. कदाचित अतिशयोक्ती वाटेल, हा आवाज कदाचित गेट वे ऑफ इंडियातील फेरी बोटीत पोहचला असेल आणि मग प्रत्येक सुपर हिट डायलॉग पडद्यावर येण्यापूर्वीच पब्लिकमधून तोच डायलॉग बोलायला सुरुवात. बहुत याराना लगता है असो वा इसलिये के लोहा लोहे को काटता है असो, पब्लिक अगोदरच बोलू लागला.

काय भन्नाट अनुभव हो. असं वाटलं, पन्नास वर्षांपूर्वीचेच ते मिनर्व्हातील दिवस. पब्लिकचा तसाच जोश, तेवढाच उत्फूर्त जल्लोष. महान कलाकृती कायमच महान असते. सुपर हिट पिक्चर कायमच सुपर हिट असते. भले मग, शोलेमध्ये पाहण्यासारखे काय आहे असा वर्षानुवर्ष तिरसट प्रश्न करणारे असोत. आपल्याकडील चित्रपट रसिकांनी एकादा मसालेदार मनोरंजक चित्रपट डोक्यात व डोक्यावर घेतला की त्याला कोणीच खाली उतरून देऊ शकत नाहीत. यह पब्लिक है. त्यांची आवडनिवड जास्त महत्त्वाची.

शोले सेलिब्रेशन जत्रेत मग इटलीतील त्याचा प्रीमियर गाजला. तिकडेही हाऊसफुल्ल गर्दी. तोच थरार, तशीच रोमांचकता. मोठ्या पडद्यावर स्क्रीनिंग. आणि सोशल मिडियातून त्याच्या कव्हरेजला भरभरुन लाईक्स. सकारात्मक कॉमेन्टस. पन्नास वर्ष पूर्णतेबद्दल असा मुंबईत असा प्रीमियर का नाही असाही एक प्रश्न आहेच, पण आजच्या ग्लोबल युगात युरोपमधील प्रीमियर हा सर्वव्यापी ठरावा. आज जगभरातील अनेक देशांत आपले चित्रपट प्रदर्शित होताहेत. त्यानुसार विदेशात शोले पन्नास वर्ष पूर्णतेचा बहुचर्चित प्रीमियर.

मुंबईत शोले सेलिब्रेशनचा एक अनोखा फंडा पहायला मिळाला. नरिमन पॉईंट येथील एनसीपीए या भव्य दिमाखदार सभागृहात पडद्यावर शोलेची काही दृश्य व गाण्यांचा काही भाग (पण आवाज नाही) आणि समोरच शंभर वादकांचा आधुनिक वाद्यांसह ताफा आणि त्यांचे शोलेचे संगीत व पार्श्वसंगीत. एक भन्नाट अनुभव. भरपूर मेहनत घेऊन या सगळ्याचे आयोजन. खर्चिक गोष्ट, पण शोलेची शान त्यात दिसली. यूट्यूबवर हे सगळेच पहायला मिळतेय. एखाद्या चित्रपटाची अशीही दखल घेतली जाऊ शकते. शोलेतील गाणी मात्र त्या काळात चित्रपट सुपर हिट ठरल्यावर लोकप्रिय झाली. १९७५ साली संगीतकार राहुल देव बर्मनचे गुलजार दिग्दर्शित आंधी व किनारा, रवि टंडन दिग्दर्शित खेल खेल मे या चित्रपटांचे संगीत जास्त लोकप्रिय होते. विशेषतः आंधीची गाणी आजही तेवढीच श्रवणीय.

आता तर शोलेतील नाणे! चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त एक विशेष उल्लेखनीय आठवण म्हणून असे नाणे प्रकाशित करणे ही कल्पनाच भन्नाट. चित्रपटात हे नाणे जणू एक व्यक्तिमत्व आहे. जय व वीरू यांच्या नात्यातील महत्त्वाची गोष्ट. मला आठवतंय मिनर्व्हात शोले अनुभवताना नाणेफेकीच्या प्रसंगात हे नाणे जणू आपल्या आसपास पडलयं असा जबरदस्त फिल येई. स्टीरिओफोनिक साऊंड सिस्टीम म्हणजे काय याचा तो अनुभव आणि याच नाण्यावरुन अनेक किस्से, गोष्टी, कथा, दंतकथा. त्यात त्या नाण्याच्या दोन्ही बाजू एकच हा ट्विस्ट गाजलेला.

शोलेच्या पन्नास वर्ष पूर्णतेच्या सेलिब्रेशनच्या अशा एकेका गोष्टी या लोकप्रिय कलाकृतीचा प्रभाव अधोरेखित करताहेत. या गोष्टी चित्रपट रसिकांचा उत्साह वाजवताहेत.


सध्या चित्रपटाच्या जगात विशेष काय चाललयं, या प्रश्नावर मी त्याच तत्परतेने उत्तर देतो, शोलेचे पन्नास वर्ष पूर्णतेचे सेलिब्रेशन सुरू आहे, आजही, उद्याही व केव्हाही असे म्हणतो. शोलेसह सामाजिक सांस्कृतिक माध्यम क्षेत्रांचाही पन्नास वर्षांचा बदलता प्रवास सुरू आहे. तोदेखील उल्लेखनीय. शोले म्हणजे न संपणारी कथा, पटकथा व संवाद. यशाच्या गोष्टी कायमच कौतुकाच्या असतात. शोलेची तशीच तर आहे...


---


# ‘युनेस्को’च्या व्यासपीठावर
# १२ पराक्रम स्थळे

महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसास्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेनेदेखील गड-किल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पुर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.







दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी World Heritage Convention, १९७२ तयार करण्यात आले.

भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, सात नैसर्गिक, एक मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे.

महाराष्ट्रातील हे १२ किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत. हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे.थोडक्यात, प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे.जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रूंपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील ‘माची’ एक वैशिष्ट्य असते. किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.

शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. ‘गनिमी कावा’ अर्थात ‘गुरीला’ युद्धनीतीमध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते.

हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात. या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन, मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्मानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून, स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अमूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहचेल आणि जगातील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**-प्रवीण टाके,**
**उपसंचालक (माहिती)**

---

# ‘महाराष्ट्राचे सॉक्रेटिस’ वामन मल्हार जोशी



वामन मल्हार जोशी हे कथा-कादंबरीकार, साहित्य समीक्षक आणि तत्त्वचिंतक होते. ‘महाराष्ट्राचे सॉक्रेटिस’ म्हणून ओळखले गेलेले वामन जोशी यांचा आज स्मृतिदिन...

वामन जोशी यांचा जन्म २१ जानेवारी १८८२ रोजी तत्कालीन कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील तळे या गावी झाला. १९०६मध्ये त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र हे विषय घेऊन एमए केले. त्यानंतर कोल्हापूर येथील समर्थ विद्यालयात अध्यापनाचे काम केले. विजापूरकरांच्या बरोबर विश्ववृत या मासिकाच्या संपादनाची जबाबदारीही स्वीकारली.

याच मासिकात १९०८मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘वैदिक धर्माची तेजस्विता’ या लेखाबद्दल राजद्रोहाचा आरोप येऊन जोशी यांना तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर पाच वर्षे केसरी-मराठा संस्थेत त्यांनी काम केले. पुढे महर्षी कर्वे यांच्या हिंगणे येथील पाठशाळेत प्राध्यापक म्हणून ते दाखल झाले (१९१८) व सेवानिवृत्तीपर्यंत त्याच संस्थेत वेगवेगळ्या पदांवर काम करीत राहिले. १९३० साली मडगावमध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

रागिणी अथवा काव्यशास्त्रविनोद (दुसरी आवृत्ती १९१५) या जोशी यांच्या पहिल्याच कादंबरीमुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यानंतर ‘आश्रमहरिणी’ (१९१६), ‘नलिनी’ (१९२०), ‘सुशिलेचा देव’ (१९३०), ‘इंदु काळे व सरला भोळे’ (१९३४) या चार कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. कर्तव्य आणि ध्येयनिष्ठा; कलाप्रेम आणि नीतीबंधने; बुद्धी आणि श्रद्धा; व्यक्तिस्वातंत्र आणि सामाजिक-नैतिक बंधने यांसारखे जीवनविषयक मौलिक प्रश्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून उपस्थित केले. कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांच्या अन्य लेखनालाही एक लक्षणीय वैचारिक बैठक आहे. त्यांचे साहित्यसमीक्षात्मक लेखन थोडेच असले तरी त्यातून साहित्यविषयक मूलभूत प्रश्न उपस्थित करून त्यांची सोडवणूक कोणत्या दृष्टीने करावी याचे अचूक मार्गदर्शन त्यांनी केले आहे.

मराठी वाङ्येतिहासातील १८८५ ते १९२० या महत्त्वपूर्ण कालखंडात वामन जोशी यांचा उदय झाला. इतकेच नव्हे तर कादंबरीकार व कथाकार म्हणून त्यांनी नावलौकिकही मिळवला. हा नावलौकिक दुहेरी स्वरूपाचा होता. एकीकडे वामन जोशींनी तत्कालीन बुद्धिजीवी, रसिक वाचकांशी आपल्या कादंबऱ्यांतून विशेषतः ‘रागिणी’तून संवाद साधला आणि दुसरीकडे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारख्या साक्षेपी समीक्षकाचे तत्काळ लक्ष वेधून घेतले. वाचक व समीक्षक यांना एकाच वेळी आवाहन करणे त्या कालातील सगळ्याच मोठ्या लेखकांना साध्य झाले, असे म्हणता येणार नाही. हे खास वामन जोशींचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे दुसरे वैशिष्ट्य हे की, त्यांच्या या आवाहनातील सातत्यही वेगवेगळ्या कारणांमुळे टिकून राहिले.

वामन मल्हारांच्या कादंबऱ्या आजच्या वाङ्‌मयीन, सामाजिक-राजकीय सांस्कृतिक वास्तवात प्रस्तुत का वाटतात याचा शोध याच मार्गाने, पण अधिक खोलात जाऊन अधिक सविस्तरपणे घेणे शक्य आहे. त्यांनी स्वकालीन वाचकांनाही वेधून घेतले. हे सोपे नव्हते, कारण तो वाचक वेगळ्या प्रकारच्या कादंबरीत गुंतलेला होता. त्याला जे हवे होते ते वामन मल्हारांनी मुळीच दिले नाही. त्या बाबतीत मुळीच तडजोड न करता ते आपल्या मार्गानेच गेले. या मार्गाने जात असताना जुन्या कादंबरीत गुंतलेला वाचक आपल्याकडे थोडाफार वळेल हा आत्मविश्वास त्यांना होताच, पण त्यापेक्षाही, त्या वातावरणात घडलेल्या नव्या, गंभीर प्रकृतीच्या वाचकाच्या हाती वेगळ्या प्रकारचे साहित्य देण्याची गरज आहे, याचे भान वामन मल्हारांना होते. प्रत्येक लेखकाने आपला विशिष्ट वाचक कसा हेरला पाहिजे व त्याच्याशी कोणत्याही तडजोडी न करता कसा संवाद साधला पाहिजे याचे प्रात्यक्षिकच जणू वामन जोशींनी दाखवले.

अशा रीतीने त्यांच्या वाचकवर्गात जुने वे नवे असे दोन्ही प्रकारचे वाचक एकत्र आले. त्या संपर्काचा दोघांनाही लाभ झाला. भविष्यकाळातील वाचकावर विसंबून न राहता वर्तमानकाळातील वाचकावरच केंद्रित करणे आणि त्याच्यातच आपल्या भावी वाचकाचेही प्रतिबिंब पाहणे या दोन्ही गोष्टी वामन जोशी यांनी समांतरपणे साधल्या. अशा या प्रतिथयश साहित्यिकाचे २० जुलै १९४३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## निवडक

### सावन तवसाळकर यांची नियुक्ती



**श्रीवर्धन :** शिवसेनेची बैठक राजेश चव्हाण यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीला जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी तालुक्यातील संघटनात्मक विषयाबद्दल बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. शिवसेनेचे शहरप्रमुख देवेंद्र भूसाणे यांनी राजीनामा दिल्यामुळे सदरचे पद रिक्त होते. त्यामुळे शिवसेना शहर प्रमुखपदी सावन तवसाळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राजेश चव्हाण यांना शहर संघटक म्हणून नेमण्यात आले आहे.

### मोहन धस यांची निवड



**कर्जत :** तालुक्यातील चांदई येथील रहिवाशी मोहन धस यांची अंबरनाथ नगरपरिषद नगरपथ विक्रेता संघाच्या निवडणुकीत बिनविरोध निवड झाली आहे. अंबरनाथ नगरपरिषद नगर पथविक्रेता समितीची निवडणूक झाली. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुरबाड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी काम पाहिले. या निवडणुकीसाठी वेगवेगळ्या गटासाठी निवडणूक घेण्यात आली. त्या निवडणुकीतील नागरिकांचा मागास प्रवर्ग गटातून मोहन भगवान धस यांनी निवडणूक लढविली, मात्र या निवडणुकीत धस यांची बिनविरोध निवडणूक झाली असून नगर पथविक्रेता समितीवर बिनविरोध निवडले गेले आहेत.

# चौकमध्ये विजेचा सावळागोंधळ

**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरात वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या प्रचंड प्रचंड संताप आहे, याची जाणीव कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे विद्यासागर शिंदे यांना झाल्याने त्यांनी चौक कार्यालयात येऊन स्थानिक नेते यांच्याशी चर्चा केली.

चौक परिसरात विजेचा सावळागोंधळ अनेक महिने सुरू आहे, याकडे वीज वितरण कंपनी यांनी दुर्लक्ष केल्याने नागरिक,व्यापारी, डेरी उत्पादक, मिठाई दुकानदार, झेरॉक्स, विद्यार्थी, रुग्ण, वयोवृद्ध, ग्राहक यांच्यात संताप निर्माण झाला आहे. स्थानिक अधिकारी यांच्याशी वारंवार चर्चा करून देखील काहीही उपाययोजना करण्यात आली नाही. उलट पावसाळ्यापूर्वी ची कामे रखडली असा आरोप स्थानिक नेते करीत आहे, एक दिवस असा नाही की वीज पुरवठा सुरळीत होत आहे. त्यामुळे सरपंच रितू ठोंबरे व विविध पक्षांचे नेते, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते यांनी वीज पुरवठा करणाऱ्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधला होता. आणि त्यांना खंडित होणाऱ्या वीज पुरवठा बाबत माहिती दिली, सद्या नव्याने कनिष्ठ अभियंता चौक येथे रुजू झाले आहेत. त्यांनी या परिसरातील वीज खंडित का होते? याचा सर्वे केला, मेंटेनन्स हे कारण समोर आले असून, अनेक वर्ष हा प्रकार सुरू असून ग्राहकांना सेवा देण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला नाही, असाही आरोप होत आहे.

**महावितरण कार्यालयात बैठक**



पाताळगंगा येथून होणारा वीज पुरवठा नेहमीच खंडित होतो, पावसाळ्यात हा प्रकार जास्त घडतो, त्यामुळे नवीन मार्ग काढण्यात यावा. काही तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत, त्याचाही विचार केला जाईल, येत्या काळात वीज पुरवठा सुरळीत राहील यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगण्यात आले. या वेळी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, ग्राम पंचायत सदस्य, व्यापारी नेते यांनी चर्चेत भाग घेतला. तत्पूर्वी कार्यकारी अभियंता विद्यासागर शिंदे यांनी उप अभियंता मुंढे, कनिष्ठ अभियंता देसाई व येथील कर्मचारी यांच्याशी संवाद साधून अडचणी समजून घेतल्या. आमच्याकडून लागणारे सहकार्य करण्याची आमची इच्छा आहे, फक्त वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी माफक मागणी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांनी व्यक्त केली.

# माथेरानमध्ये दुकानात चोरी

**माथेरान : प्रतिनिधी**

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये चोरीची घटना घडली असून अज्ञात चोरांनी दुकानाचे टाळे व कड्या तोडून रोख रक्कम आणि दुकानातील काही माल लंपास केला.

माथेरानमधील इंदिरा गांधी नगर विभागातील साईकृपा कोल्ड्रिंग्स व किराणा स्टोअरमध्ये शुक्रवारी रात्री चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे टाळे व कड्या उचकून दुकानात प्रवेश करत रोख रक्कम व सिगारेटच्या पाकिटांसह अंदाजे १५ ते २० हजार रुपयांचा माल लंपास केला. दुकानाचे मालक महेंद्र जाबरे यांनी दिलेल्या माहितीनुसार अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या मागील बाजूने प्रवेश करून आणि मागचा दरवाजा पुढील शटरचा भाग व आतील दरवाजे असे एकूण तीन दरवाजे तोडून दुकानात प्रवेश केला. आता माथेरान शहरातसुद्धा चोरीच्या घटना सुरू झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. माथेरान पोलीस ठाण्याचे निरीक्षक अनिल सोनोने व एपीआय गणेश गिरी या घटनेचा तपास करत आहेत.

**“आम्ही नेहमीप्रमाणे रात्री साडेदहा वाजता दुकान बंद करून घरी गेलो. सकाळी नऊ वाजता दुकान उघडण्यासाठी आलो असता आम्हाला दुकानाचे दरवाजाचे कुलूप तोडलेले दिसले शटर पट्टी तोडलेली दिसली. त्यामुळे आम्ही दुकानात आतील बाजू तपासून पाहिली असता रोख रक्कम सिग्रेटचे पॅकेट चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यामुळे आम्ही लागलीच पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.**

**–महेंद्र जाबरे, दुकान मालक**

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, महिलांना छत्रीवाटप आणि वृक्ष लागवड



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस तथा शाळेचे माजी विद्यार्थी कृष्णा बामणे यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा परिषद वाशी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वृक्षारोपण करून शुक्रवार (दि.१८) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रोहा तालुका भाजप अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला आला तसेच गावातील महिलांना छत्री वाटप करण्यात आले.

वेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी शाळेच्या प्रगतीचे व कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले तर या शाळेचे वैभव लक्षात घेऊन इथल्या शिक्षकांनी आणि व्यवस्थापनाने अतिशय चांगले काम केले आहे ही शाळा इतरांसाठी प्रेरणादायक आहे. असे घाग म्हणाले.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा सरचिटणीस नरेश कोकरे, रोठ खुर्द बुथ अध्यक्ष राजेश मोरे, रवींद्र डाकी, निलेश जंगम, स्वप्निल वाळंज, विकास बामणे, भाजप रोहा ट्रान्सपोर्ट सेलचे अध्यक्ष निलेश धुमाळ, दरनेश दारला यासह गायत्री मॅडम, यशवंत लहाने, मारुती जंगम, सखू अक्का लहाने, काशीबाई बाकडे, विश्वासिनी जोगड, मोठी आई, दीपक फाउंडेशन सायली जोगडे, पुजा जंगम आदी उपस्थित होते.

# महादेववाडी शाळेत पालक संवाद मेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील महादेववाडी शाळेत पालक संवाद मेळावा घेण्यात आला आहे. या मेळाव्यासाठी बहुसंख्येने पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या पालक संवाद मेळाव्यात नाईक मॅडम यांनी विद्यार्थी शिस्त, गुणवत्ता, पालकांचे विद्यार्थी मार्गदर्शन बाबत मार्गदर्शन केले तर तपकीरे सर यांनी श्रमदान, शालेय स्वच्छता, विद्यार्थी सहभाग याबाबत मार्गदर्शन केले.

केंद्रप्रमुख श्री गायकर सर यांनी लोकसहभागातून शिक्षण, शालेय उपक्रम, विविध स्पर्धा, योजना याबाबत मार्गदर्शन केले, श्री ललित सर यांनी शिष्यवृत्ती, नवोदय स्पर्धाबाबत मार्गदर्शन केलेस्मिता मॅडम नि विद्यार्थी लेखन वाचन गायन बाबत माहिती दिली.

पालकांनी चर्चेत सहभाग घेतला १०० पटवाढीस प्रयत्न केले जातील, सर्व उपक्रम मध्ये योगदान देणे बाबत माहिती दिली. यावेळी पालक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ, अधिकारी यामध्ये समन्वयातुन विद्यार्थी भावनिक, शारीरिक, बौद्धिक विकास साधला जाईल, असे ठरविण्यात आले आहे.



# कर्जतच्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर आमदार थोरवे आक्रमक





**कर्जत : प्रतिनिधी**


कर्जत–मुंबई–पुणे मार्गावर असलेले पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनलेल्या कर्जत शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर कर्जतच्या प्रशासकीय भवनात वाहतूक समस्येवर उपाययोजना करण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत आमदार महेंद्र थोरवे आक्रमक होत त्यांनी अधिकाऱ्यांना फटकारत स्पष्ट शब्दांत कारवाईचे निर्देश दिले.

कर्जत परिसरात रस्त्यांवरील खड्डे, अरुंद रस्ते, बेशिस्त वाहनचालक व अपुरी पोलीस यंत्रणा यामुळे ट्रॅफिक कोंडीने गंभीर रूप धारण केले आहे. विद्यार्थी, स्थानिक नागरिक आणि पर्यटकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक संदीप भोसले, शिवाजी ढवळे, गटविकास अधिकारी सुमित पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता संजीव वानखेडे, रायगड वाहतूक शाखेचे अभिजीत भुजबळ, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, परिवहन अधिकारी निलेश धोटे महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी, एमएमआरडीएचे अधिकारी आदी उपस्थित होते.

# खांदाड गावात आढळले दुर्मीळ खवले मांजर

**माणगाव : बातमीदार**



माणगावमधील खांदाड गावातील तरुण नेहमीच पर्यावरणाप्रती जागरूक असतात हे पुन्हा एकदा पाहायला मिळाले आहे. शुक्रवारी (दि.१८) रात्रीच्या सुमारास माणगावातील खांदाड गावात येथील स्थानिक तरुण राजू पवार हे आपली मोटारसायकल घेऊन सोनभैरव मंदिराकडे जात असताना गावाजवळ वस्तीलगत त्यांना एक अनोळखी विचित्र वन्यजीव जमिनीवर दिसून आला, त्यानंतर राजू पवार व त्यांचे मित्र शशिकांत पवार हे हा वन्यजीव कोणता आहे हे पाहण्यासाठी थांबले, मंदिर परिसरात गावकीची मीटिंग असल्यामुळे गर्दी जमली होती आणि हा वन्यजीव कोणता आहे याबद्दल कुतूहल निर्माण झाले. त्यामुळे त्वरित ग्रामस्थांनी माणगांवचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना संपर्क साधला.

वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर तातडीने येथे पोहोचले व त्यांनी वनविभागालादेखील याबद्दल त्वरित माहिती दिली, वनरक्षक येथे पोहोचेपर्यंत कुतूहलापोटी जमलेल्या खांदाड गावच्या सर्व तरुणांना व ग्रामस्थांना खवले मांजर या प्राण्याची ओळख पटवून देत या प्राण्याबद्दल जनजागृती करत शंतनु कुवेसकर यांनी जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

वन्यजीव आणि पर्यावरणाबद्दल खांदाडचे तरुण आणि जेष्ठ अतिशय संवेदनशील असून खवले मांजराची काही काळासाठी परिसरातील भटके कुत्रे आणि इतर धोक्यां पासून रक्षा करून मानववस्तीनजीक आढळल्याने एका प्रकारे त्याचे बचावकार्यच सर्व तरुण व जेष्ठांनी केले आहे विशेष म्हणजे सदर ठिकाणी माणगांवचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, तसेच गावकीचे अध्यक्ष काशीराम पवार, गावचे पोलीस पाटील नथुराम पोवार सर्व युवावर्ग ग्रामस्थांसोबत उपस्थित होते.

शंतनु कुवेसकर यांच्यामार्फत सदरचे सशक्त तंदुरुस्त असलेले खवले मांजर त्वरित वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आले, त्यानंतर रात्री वनविभागाचे उपवनसंरक्षक शैलेंद्रकुमार जाधव व सहाय्यक उपवनसंरक्षक रोहित चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांवचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या सूचनेप्रमाणे उपस्थित वनपाल डी. एस. सुभेदार, वनरक्षक वैशाली भोर, पवन चौधरी संतोष पिंगळा, राणी लिंबोरे, वाहनचालक विवेक जाधव यांच्यामार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करून खवले मांजरास सुरक्षित ठिकाणी त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे, असे वनविभागाकडून कळवण्यात आले.

# पाली पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक

**पाली : प्रतिनिधी**

सण व उत्सव हे नेहमीच समाजमने जोडून एकात्मता, बंधुभाव वृद्धिंगत करण्यास उपयुक्त ठरतात. प्रत्येकाने एक जबाबदार व कर्तव्यदक्ष नागरिक या नात्याने कायदात सुव्यवस्थेसह कायम जातीय सलोखा राखावा असे आवाहन पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी जनतेला केले.



आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाली पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या अधिपत्याखाली नुकतीच शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. यावेळी विविध विषयांवर महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

या वेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले. गणेश मंडळासमोर जातीय सलोखा कायम ठेवण्याचे संदेश देणा–या देखावे तयार करण्याचे आवाहन हेमलता शेरेकर यांनी केले. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी कृत्य कोणीही करू नये. जातीय सलोखा राखावा असे देखील शेरेकर यांनी सांगितले. सध्या होत असलेल्या चोरीच्या अनुषंगाने सोसायटी मध्ये व सदनिके मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसाविन्या बाबत सांगून सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काय काय उपाययोजना करण्यात यावी याबाबत चर्चा करण्यात आली. पाली शहरातील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याबाबत व ते दुरुस्तीबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला पाली नगरपंचायत नगराध्यक्ष अरिफ माणियार, समन्वय कमिटी अध्यक्ष अनुपम कुलकर्णी, सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, भाजपा तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, शांतता कमिटी सदस्य रोहन दगडे, संजय घोसाळकर, अतिश सागळे, किसन उमटे, गजानन शिंदे, सुमेश खैरे, राहुल गायकवाड, सुधीर साखरले, महमद धनसे आदींसह पोलीस उपस्थित होते.

# कर्जत एसटी बसथांब्यावर स्वयंचलित महिला सुविधा केंद्राचे लोकार्पण



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानका नजिकच्या एस टी थांब्या जवळ सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वूलू संस्था यांच्या संयुक्त सहभागाने स्वयंचलित महिला सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचा उदघाट्न सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सुविधा केंद्राचा लोकार्पण सोहळा झाला.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते फीत कापून या केंद्राचे उदघाट्न करण्यात आले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर, माजी नगरसेवक संकेत भासे, अभिषेक सुर्वे, संभाजी जगताप, शरद बडेकर, प्रमोद खडे, दिनेश कडू, वूलू संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिष केळशीकर, उपाध्यक्ष सरस्वती सिंग, वाणिज्य प्रमुख श्रेया कुंभवडेकर आदी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे व शाखा अभियंता अक्षय चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार महेंद्र थोरवे यांनी या परिसरात कर्जत स्थानकातून येणाऱ्या महिला प्रवाशांची तसेच एसटीने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची खूप गैरसोय व्हायची म्हणून हे सुसज्ज असे महिला सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. तसेच या केंद्राच्या बाजूला पुरुषांसाठी सुद्धा स्वच्छतागृह उभारण्यात येणार आहे. जेणे करून सर्वच प्रवाशांना सुविधा उपलब्ध होईल. त्याच बरोबर कर्जत व खालापूर तालुक्यात सुद्धा गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारची सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी लागणार आमदार निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असा शब्द दिला.

या वेळी प्रदीप वायकर, किशोर कदम, वैभव सुरावकर, ज्ञानेश्वर कर्णूक, रोहित ओसवाल, नदीम खान, जनार्दन खंडागळे, भरत बामणे, दर्शन वायकर, विनोद दुलगज, संदीप कर्णूक, रोहित बाफना आदी उपस्थित होते.

या स्वयंचलित महिला सुविधा केंद्र उभारणीसाठी पंधरा लाख रुपये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली होती, मात्र १२ लाख ४५ हजार रुपयांची तांत्रिक मान्यता प्रदान करून निविदा काढण्यात आली होती. यामध्ये महिलांसाठी वॉश रूम्स, वातानुकुलीत स्वच्छतागृह, चेंजिंग रूम, बेबी डायपर स्टेशन, सॅनेटरी पॅड डिस्पेंसर, बेबी डायपर व्हेंडिंग मशीन, फ्रेशनर आदी सुविधा उपलब्ध आहेत.

**रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल खारघर**
प्लॉट न. ११ व ११अ, सेक्टर–१९, खारघर, नवी मुंबई.
CBSE Affiliation No. 1130299

* शाळेसाठी खालील जागांसाठी रिक्त पदे भरावयाची आहेत.

| पद | शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| शिपाई (०१) | ८ वी पास / नापास |
| वॉचमन (०१) | ८ वी पास / नापास |
| बस क्लिनर (०३) | ८ वी पास / नापास |

वरील प्रकारची रिक्त पदे भरावयाची आहेत, तरी इच्छुक उमेदवारांनी शाळेत मुलाखतीसाठी वरील पत्त्यावर समक्ष हजर राहावे. सोबत स्वतः चा बायो डेटा घेऊन येणे आणि त्यासोबत आधार कार्ड, पॅनकार्ड व एक फोटो घेऊन येणे.
अनुभवी उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

आपला अर्ज ई मेल द्वारे पाठविणे किंवा स्वतः २२/०७/२०२५ पूर्वी घेवून येणे.
(Contact No. ०२२–२७७४४४१०, २७७४४५७७)
WhatsApp on ९५९४८१०४८३/९६६४२६८०४५
Mail your Bio data at Email - rtpskhgr@gmail.com

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमूद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षीक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत आहे. संस्थेचे नांव : **सहकार व्दारका–१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मोरबे, ता. पनवेल जि. रायगड** कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्वीकृती :– दिनांक २१.७.२०२५ ते २५.७.२०२५ नामनिर्देशनाची यादी प्रसिध्द करणे. दिनांक २५.७.२०२५ नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक :– दिनांक २८.७.२०२५ नामनिर्देशन पत्र माघारी दिनांक: दिनांक ३०.७.२०२५ ते १३.८.२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २४.८.२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशीलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधीक माहिती संस्थेच्या कार्यालयात व निवडणूक निर्णय अधीकारी तथा लेखापरीक्षक, सहकारी संस्था, पनवेल इंदिरा हरिहर बिल्डींग, तळमजला, लाईन आळी. न्यु म्हात्रे हॉस्पीटल शेजारी, पनवेल येथील कार्यालयात पहावयांस मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
(मोहन ढेरंगे)
निवडणूक निर्णय अधीकारी,
तथा लेखापरीक्षक
सहकारी संस्था, पनवेल

# पूर ओसरला, नालेसफाई जैसे थे!

## धाटाव एमआयडीसीत कचरा, माती आणि सांडपाणी



**धाटाव : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने काही दिवसांपूर्वी धाटाव औद्योगिक वसाहतीला तडाखा दिला होता. नालेसफाई न झाल्यामुळे अनेक कारखान्यांसमोरील परिसर व व कारखाने पाण्याने तुडुंब भरले होते. एफडीसी, रोहा डाय, निलिकॉन, मजदा, राठी डाय, प्रिव्ही, बेक केमिकल, निरलॉन या कारखान्यांच्या प्लांटमध्ये पाणी साचले होते. पुराचं पाणी आता ओसरले असले तरी परिस्थिती पूर्ववत झालेली नाही. वसाहतीतील नाले अजूनही कचऱ्याने, मातीने व औद्योगिक केमिकलच्या सांडपाण्याने तुडुंब भरलेले दिसत आहेत.

धाटाव एमआयडीसीतील कारखान्यांच्या नुकसान झालेल्यास जबाबदार नालेसफाईचा ठेकेदार आहे, असा आरोप भाजपचे बूथ अध्यक्ष सचिन मोरे यांनी केला आहे. त्यांनी पुढे म्हटलेय की, अनेक ठिकाणी गाळ, प्लास्टिकचा कचरा आणि रासायनिक सांडपाणी नाल्यांमध्ये खुलेआम साचलेले आहे. ही परिस्थिती पाहता फक्त कागदावर सफाई दाखवली गेली आणि प्रत्यक्षात कामाला हरताळ फासला गेला आहे. दरवर्षी साडेअकरा लाख रुपयांची सफाईच्या नावावर बिले काढले जातात. साफसफाईच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू आहे. यामागे मोठा आर्थिक गैरव्यवहार असण्याची शक्यता असून, आम्ही लवकरच याचा संपूर्ण खुलासा करू.

दरम्यान, या स्थितीमुळे औद्योगिक वसाहतीतील उद्योजक आणि कामगार त्रस्त झाले आहेत. नालेसफाई न झाल्यास पावसाळ्यात पाणी तुंबण्याची भीती आहे. संबंधित यंत्रणांनी याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी मागणी कामगारवर्गातून केली जात आहे.

# पेण येथे पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना उमेदवार निवड मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग व पेण एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आणि मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना उमेदवार निवड मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील रिक्तपदांच्या, प्रेंटिसशिपची भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एसएससी-एचएससी, आयटीआय, डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर व इतर पदवीधारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल.

प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Employment-Job Seeker (Find - Job)- Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करा. मग त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing-I Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनामध्ये इंटर्शिपला अप्लाय करण्यासाठी https://cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Intern Loginला क्लिक करुन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली प्रोफाईल व शैक्षणिक माहिती अद्ययावत करा. मग Apply for Jobsला क्लिक करून आपला जिल्हा निवडून दिसणाऱ्या आस्थापनेच्या रिक्तपदांना Apply करावा.

रोजगार मेळाव्यातील रिक्त पदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९वर संपर्क साधावा आणि जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अ.मु. पवार यांनी केले आहे.

# रेवदंडा येथे एसटी बसच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

एसटी बसची धडक बसल्याने रेवदंडा गोळा स्टॉप येथे ७० वर्षीय वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

रेवदंडा येथील रेळे यांच्या डोळे तपासणी व मोफत ऑपरेशन शिबिरास भेट देऊन घरी जात असलेल्या बोर्ली मांडला गावातील मधला पाडा येथील वृद्ध महिला नम्रता वरसोलकर या गोळा स्टॉप येथे प्रवासी वाहनाची वाट पहात होत्या. त्या वेळी दुपारच्या दरम्यान तेथून जात असलेल्या स्वारगेट-मुरूड एसटी बसचा (एमएच २० बीएल २९३३) चालक शरफोदिन अब्दुल करीम शेख (रा. मुरूड) याने बेदरकार वाहन चालून नम्रता वरसोलकर यांना धडक दिली. या वेळी डोक्याला गंभीर स्वरूपाची जखम झाल्याने ही वृध्द महिला जागीच कोसळून मृत्युमुखी पडली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# नेत्रदानाची टक्केवारी वाढविणे खूप महत्त्वाचे -डॉ. सुहास हळदीपूरकर

**कर्जत : प्रतिनिधी**

नेत्रदानाबद्दल आपल्याकडे जनजागृती हवी तशी नाही. त्यामुळे दृष्टी नसलेल्यांना दृष्टी देणे शक्य होत नाही. नेत्रदानाची टक्केवारी वाढविणे खूप महत्त्वाचे आहे. आम्हाला एक लाख लोकांना मोतीबिंदू शास्त्रक्रिया करून चांगली दृष्टी देण्यासाठी पंचवीस वर्ष लागली, पण तुमच्या सर्वांच्या सहकार्याने येत्या दहा वर्षात आपल्याला एक लाखाचा टप्पा पार पाडायचा आहे. स्व. डॉ. शशिकांत देसाई यांनी कर्जतमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्रदान यासाठी चांगले कार्य केले होते. आता पुन्हा आपण या कार्यासाठी सज्ज होऊ या, असे आवाहन सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. सुहास हळदीपूरकर यांनी येथे केले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत, रोटरी क्लब पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या सहकार्याने कर्जतमध्ये मोफत डोळ्यांच्या दवाखान्याचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने श्री कपालेश्वर देवस्थानच्या सभागृहात विशेष समारंभाचे आयोजन सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. डॉ. सुहास हळदीपूरकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभाचे उदघाटन झाले. या प्रसंगी विजय हरिश्चंद्रे, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. प्रफुल्ल सामंत, माजी नगरसेवक भालचंद्र जोशी, विवेक दांडेकर, मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, शिबीर संयोजक विनोद पाचघरे, कैलास पोटे आदी उपस्थित होते.



आशिष गोखले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विवेक भागवत यांनी प्रस्ताविकात मंडळाच्या कार्याचा आढावा सादर केला. विजय हरिश्चंद्रे यांनी मनोगत व्यक्त केले. राजाभाऊ कोठारी यांनी अध्यक्षीय भाषणात, कर्जतमध्ये पाचशेच्या वर रक्तदान शिबीरे आयोजित करून सुमारे सत्तर हजार पिशव्या रक्त संकलित केले आहे. तशाच प्रकारचे आयोजन करून गाव खेड्यात, अगदी आदिवासी पाड्यात जाऊन नेत्रदान शिबिरांचे आयोजन करण्याचा मानस आहे. यापूर्वी आम्ही पंधरा वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांची तपासणी केली होती. त्यावेळी पन्नास टक्केच्या वर विद्यार्थ्यांमध्ये दृष्टी दोष आढळला. आता तर मोबाईलच्या युगात किती विद्यार्थ्यांच्या डोळ्यात दोष असेल ते सांगता येत नाही. रक्तदानाबरोबरच नेत्रदानही हे सर्वश्रेष्ठ दान आहे' असे सांगितले. सूत्रसंचालन विवेक भागवत यांनी केले. यानंतर डोळ्यांच्या दवाखान्याचे उदघाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले.

# गोरेगाव येथे महिलांसाठी विविध कोर्सचे प्रशिक्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील चारिझेन फाउंडेशनतर्फे महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत शिवणकाम, ब्युटीशिअन आणि मेहंदी प्रशिक्षणाच्या सातव्या बॅचचा शुभारंभ गोरगाव येथे संजीवनी सामाजिक चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्ष शितल गोगावले-कदम यांच्या हस्ते झाला.



या शुभारंभावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे, उपतालुकाप्रमुख जगदिश दोशी, महाड विधानसभा मतदारसंघ समन्वयक निलेश केसरकर, विभाग प्रमुख दिनेश हरवंडकर, शहरप्रमुख सचिन शिगवण, युवा नेते रोहित रातवडकर, विरेन मेहता, महिला आघाडीच्या वंदना शेठ, उपशहर संघटिका रेश्मा यादव तसेच परिसरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे आयोजन चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन एन. एस. रंधावा, उपाध्यक्ष सतीश काळे, मार्केटिंग हेड राकेश पडवळ, युथ को-ऑर्डीनेटर जय दोशी, महिला को-ऑर्डीनेटर सुजाता इंगळे, जान्हवी लाड व टीमने केले होते.

या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्टचा मागास व मध्यमवर्गीय महिलांना स्वावलंबी बनवणे हा असून या प्रशिक्षणांद्वारे महिलांना स्वतः चा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळत आहे. त्यामुळे महिला छोट्या उद्योजिका बनत असून कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबतच स्वतः चे आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकत आहेत.

## बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ महाराष्ट्र या उपक्रमाविषयीची माहिती स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या बेरोजगार तरुणांपर्यंत पोहचावी यासाठी २२ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग येथे स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अ.मु. पवार यांनी केले आहे.

# मुरूड यशवंतनगर येथे आरोग्य तपासणी शिबिर;103 जणांनी घेतला लाभ

**मुरूड : प्रतिनिधी**

लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या सहकार्याने लायन्स क्लब अलिबाग पोयनाड व मुरूड जंजिरा यांच्या विद्यमाने मुरूड तालुक्यातील यशवंतनगर येथे मोफत नेत्र तपासणी, नेत्रबिंदू शस्त्रक्रिया व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा पंचक्रोशीतील सुमारे १०३ रुग्णांनी लाभ घेतल्याची माहिती लायन्स क्लब अलिबाग पोयनाडचे अध्यक्ष गुरूनाथ माळी यांनी दिली.



आगरी समाज सभागृहात झालेल्या या शिबिराला जागतिक आरोग्य सल्लागार सौ व श्री. सुरेश देशमुख, सौ. व श्री. मनिषा मंगेश बर्गे, आरोग्य सल्लागार विलास मोहिते आदींसह लायन्स क्लबचे विभागीय प्रमुख गिरीश म्हात्रे, विभाग समन्वयक प्रियदर्शनी पाटील, मुरूड तालुका लायन्स क्लब अध्यक्ष सनी सोगावकर, प्रशांत मिसाळ, नरेश कुबल, जमीर बकवाल आदी उपस्थित होते.

मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे, नांदगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनीही शिबिराला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.

या शिबिरात शेकडोच्या संख्येने रुग्णांची तपासणी करण्यात आली. यात १६ मोतीबिंदूचे रुग्ण आढळले असून त्यांना पुढील उपचारासाठी चोंढी येथे लायन्स क्लबचे जिल्हा समन्वयक अनिल म्हात्रे घेऊन जाणार आहेत.

या वेळी अनेक रुग्णांनी केलेल्या मोफत आरोग्य तपासणीत बॉडी चेकअप, बॉडी ॲनालिसिस शरीरातील फॅट, पाठीवरील फॅट, बीएमआय, मॅट्रोपॉलिसम, चुकीच्या जीवनशैलीमुळे होणारे आजार, शुगर, रक्तदाब, पित्त, थायरॉईड तसेच माहिती न होणाऱ्या अनेक समस्यांवरील जाणीव आणि उपाययोजनेबाबत माहिती घेतली.

# माऊंट कार्मेल हायस्कूलचा वर्धापन दिन

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रत्येक माणूस हा समाजात राहत असतो. समाजात राहूनच त्याचा विकास होत असतो. समाजाच्या प्रती ऋण बाळगून आपल्या आयुष्यातील बहुतंवशी वेळ समाजाच्या विकासासाठी देणे खूप आवश्यक आहे. समाजासाठी आपणाला काय करता येईल यासाठी जास्त विचार करून योगदान देणे खूप आवश्यक असल्याचे मत मुंबई ख्रिस्ती धर्मप्रांताचे आर्च बिशप जॉन रॉड्रिग्ज यांनी केले.





कोर्लई येथे अवर लेडी ऑफ माऊंट कार्मेल माऊलीचा सण व माऊंट कार्मेल हायस्कूलच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी उपस्थित नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आर्च बिशप जॉन रॉड्रिग्ज बोलत होते.

या वेळी कोर्लई चर्चमध्ये मिस्सा अर्पण करून गावातील ख्रिस्ती समाजातील लोकांसाठी प्रार्थना करून शुभेच्छा प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमास माऊंट कार्मेल चर्चचे फादर बोनाव्हेंचर नुनीस, मुख्याध्यापिका ज्युली चांदी, प्राथमिक शाळेचे मुख्यध्यापक सुनील वेगस, संचालक राफाएल वेगस, जॉव रुजारिओ, लिन्येस वेगस, रोशन मार्टिस, सुरेश वेगस, राजेंद्र घोसाळकर, शोधन बळकवडे, अक्षता म्हात्रे, शुभांगी पंची, वित्रीण वेगस, शोभा त्रिभुवन, सुनील वेगस, फ्लाविया मार्टिस, वैशाली मॅडम, शिक्षकेत्तर कर्मचारी अल्बर्ट मार्टिस, मुख्य लिपीक हेंरी वेगस, लुसीअन गोम्स आदी उपस्थित होते.

या वेळी आर्च बिशप जॉन रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, शिक्षणाचा हेतू हाच आहे की, विद्यार्थ्यांचे गुण हेरून ते प्रगतशील करणे आवश्यक आहे. शिक्षणाची कधी अखेर होत नसते. ज्यावेळी आपला विद्यार्थी एका विशिष्ठ क्षेत्रात प्राविण्य मिळवतो त्याचा खरा आनंद शिक्षकांना होत असतो. माऊंट कार्मेल हायस्कूलचे कार्य उत्कृष्ट असून शिक्षकवृंद हे विद्यार्थी घडवण्यासाठी विशेष मेहनत घेत आहेत. विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधीचा फायदा घेऊन आपला विकास साधावा.

फादर बोनवेंचार नुनीस यांनी, आमचे सर्व शिक्षक नम्र व मनमिळावू आहेत. शाळेप्रती शिक्षक खूप मेहनत घेऊन विद्यार्थी घडवण्याचे अनमोल कार्य करीत असल्याचे सांगितले.

ज्युली चांदी यांनी, आपण आम्हाला आशीर्वाद दिला. आमच्या कामाची प्रशंसा केली त्याबद्दल त्यांनी धन्यवाद व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अक्षता म्हात्रे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# कोल्हाण शाळेत हस्ताक्षर आणि सुलेखन कार्यशाळा

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

तळाशेत केंद्रातील उपक्रमशील कोल्हाण जिल्हा परिषद शाळेत हस्ताक्षर व सुलेखन कार्यशाळा झाली. या कार्यशाळेस सुप्रसिद्ध सुलेखनकार चंदन तोडणकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेस शाळेतील आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री. तोडणकर यांनी दोन्ही हातांनी लेखन, उजवीकडून डावीकडे लिहिण्याची कला तसेच बाटलीतील कलाकुसर यासारख्या विविध तंत्रांची माहिती देत उपस्थितांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यशाळेला शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षणतज्ज्ञ विनायक वाढवळ हे विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी नियोजन शाळेचे शिक्षक श्री. कुंडे व शाळा व्यवस्थापन समितीने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक आव्हाड यांनी केले

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये हस्ताक्षर आणि सुलेखनाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला असून अशा कार्यशाळा वारंवार घडाव्यात, अशी विद्यार्थ्यांची आणि पालकांची भावना आहे.

# इंग्लंडमध्ये वैभव सूर्यवंशीचा झंझावात

## युवा कसोटीत मेहदी हसनचा विक्रम मोडला



**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याने इतिहास रचला असून एका युवा कसोटीत अर्धशतक झळकावत आणि बळी घेतलेला सर्वात लहान वयाचा क्रिकेटपटू ठरला आहे. अवघ्या १४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने ही अतुलनीय कामगिरी करत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या युवा कसोटीत सूर्यवंशीने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागात चमकदार कामगिरी केली. पहिल्या डावात, त्याचा बॅटने फारसा प्रभाव दिसून आला नाही. त्याने फक्त १४ धावा करून माघारी परतावा लागला. दुसऱ्या डावात मात्र त्याने आपली खरी ताकद दाखवत फक्त ४४ चेंडूंमध्ये झटपट ५६ धावा ठोकल्या. या अर्धशतकासोबतच पहिल्या डावात लेफ्ट आर्म फिरकीने दोन बळी घेतले, ज्यामुळे तो एकाच युवा कसोटीत अर्धशतक आणि बळी घेणारा सर्वात लहान वयाचा खेळाडू ठरला.

या आधी ही कामगिरी करणारा सर्वात लहान वयाचा खेळाडू होता बांगलादेशचा मेहदी हसन मिराज, ज्याने २०१३मध्ये श्रीलंकेविरुद्ध मीरपूरमध्ये १५ वर्षे आणि १६७ दिवस वय असताना ही कामगिरी केली होती. हे दोनवेळा करणाराही खेळाडू तोच होता, तर भारताचा सुरेश रैना याने १५ वर्षे २४२ दिवस वय असताना हे यश मिळवले होते.

ही कामगिरी करत वैभव सूर्यवंशीने केवळ जागतिक विक्रम मोडला नाही, तर आंतरराष्ट्रीय युवा क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतके झळकावणाऱ्या सर्वात लहान खेळाडूंच्या यादीतही तो दाखल झाला आहे. भारताच्या भविष्यातील क्रिकेटपटूंमध्ये आता त्याचे नाव निश्चितच पुढे पाहिले जाईल. इंग्लंडमध्ये सध्या त्याचे प्रदर्शन चर्चेचा विषय ठरले आहे.

# सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धेस नेरूळमध्ये प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत सुब्रतो मुखर्जी कप फुटबॉल स्पर्धा २०२५-२६चे आयोजन नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने नेरूळ येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या फुटबॉल मैदानावर करण्यात आले आहे. या स्पर्धेत एकूण ९७ संघांनी सहभाग नोंदविला आहे.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील पालिका तसेच खाजगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे १५ वर्षाआतील मुलांचे ३६ संघ, १७ वर्षाआतील मुलांचे ३८ संघ आणि १७ वर्षाआतील मुलींचे २३ संघ स्पर्धेत सहभागी झाले आहेत. यासाठी ऑनलाईन प्रणालीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या स्पर्धेतून विजयी होणारा संघ पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी नवी मुंबई महापालिका जिल्ह्याचा संघ म्हणून पात्र ठरतो. त्यामुळे चुरस आहे.

शालेय स्तरावरील व शहरातील युवा फुटबॉल खेळाडूंना उत्तम सुविधा मिळत आहेत. त्याचा लाभ घेऊ खेळाडूंनी फुटबॉल खेळात स्वतःसह शहराचा नावलौकिक उंचवावा, अशी अपेक्षा व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.





# व्हॉलीबॉल सिलेक्शन ट्रायल स्पर्धा

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात संकुलस्तरीय व्हॉलीबॉल सिलेक्शन ट्रायल स्पर्धेचे आयोजन विद्यालय समिती क्षत्रिय कार्यालय पुणे यांच्याकडून करण्यात आले होते. या स्पर्धेत १० विद्यालयांच्या १०७ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या निवड स्पर्धानातून ४८ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. हे विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालय राजकोट येथे आयोजित क्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

सिलेक्शन ट्रायलचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार, उपप्राचार्य मनोज राऊत यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते. विद्यालयाचे शारीरिक व्यायाम शिक्षक अरविंदसिंह यादव, शिक्षिका पूर्वा जोशी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



# सीकेटी विद्यालयात खेळ दिवस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या वतीने खेळ दिवस साजरा करण्यात आला.

खेळ दिनानिमित्त आयोजित विविध इनडोअर गेमचे जसे कॅरम, बुद्धीबळ, लंगडी, दोरीउड्या या खेळांचे उद्घाटन पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांच्या हस्ते करण्यात आले. इयत्ता पाचवीतील ईशानी या विद्यार्थिनीने इनडोअर गेम्सबद्दल अतिशय सुंदर माहिती दिली, तर अर्णव या विद्यार्थ्याने बाह्य खेळ जसे क्रिकेट, कबड्डी याबद्दल माहिती दिली. याशिवाय श्रीराज या विद्यार्थ्यांने 'खेळ आणि आपले आरोग्य या विषयावर माहिती सांगितली.

शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी दिलेल्या स्फूर्तीमय विचारांनी विद्यार्थ्यांच्या मनात खेळाबद्दल आणि आपल्या आरोग्याबद्दल जागृती निर्माण झाली.

पूर्वा खेडेकर यांनी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख अशोक पाटील व प्रकाश रिसबूड यांच्या मार्गदर्शनाद्वारे या दिवसाचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी स्नेहा पाटील, रूपेश मढवी, नितीन म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत सारा विजेती

**मुंबई : प्रतिनिधी**

सारा जामसुतरक या मुंबई शहरच्या टेबल टेनिसपटूने शानदार कामगिरी करताना महाराष्ट्र राज्य रोख बक्षीस टेबल टेनिस स्पर्धेत मुलींच्या १५ वर्षांखालील गटाचे जेतेपद पटकावले. तिने चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात ठाण्याच्या साईशा मधुर हिचा ३-१ असा पराभव केला.

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने खार जिमखाना येथे झालेल्या या स्पर्धेत साराने चार गेममध्ये बाजी मारताना साईशाचे कडवे आव्हान ३-११, ११-९, ११-५, ११-५ असे परतवले. साराने पहिला गेम गमावल्यानंतर सलग तीन गेम जिंकून जेतेपद पटकाविले.

# भारताचा अर्जुन फ्रीस्टाईल चेस ग्रँड स्लॅम टूरच्या उपांत्य फेरीत



**लास वेगास : वृत्तसंस्था**

भारताच्या २१ वर्षीय ग्रँडमास्टर अर्जुन एरिगैसीने जागतिक बुद्धिबळात नवा इतिहास रचला आहे. लास वेगास येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या फ्रीस्टाईल चेस ग्रँड स्लॅम टूरच्या उपांत्य फेरीत पोहचणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. रोमहर्षक उपांत्यपूर्व सामन्यात त्याने जागतिक क्रमवारीत सातव्या स्थानी असलेल्या उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तारोवचा १.५-०.५ असा सहज पराभव करत अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले.

अर्जुनने या महत्त्वपूर्ण लढतीत आपला आक्रमक आणि कल्पक खेळ दाखवला. त्याने पहिला रॅपिड सामना जिंकून निर्णायक आघाडी घेतली आणि दुसरा सामना बरोबरीत सोडवत विजय साकारला.

चेस ९६० (फ्री स्टाईल) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या प्रकारात पारंपरिक चालींपेक्षा खेळाडूंच्या सर्जनशीलतेला अधिक महत्त्व दिले जाते आणि याच शैलीत अर्जुनने आपली छाप पाडली आहे. यापूर्वी साखळी फेरीतही त्याने ७पैकी ४ गुणांची कमाई करत दिग्गज खेळाडूंमध्ये आपली क्षमता सिद्ध केली होती. फॅबियानो कारुआना आणि हॅन्स नीमन हे इतर दिग्गज खेळाडूही या स्पर्धेतील उपांत्य फेरीत पोहचले आहेत.

# संभाव्य खेळाडूंच्या यादीत शमीला स्थान



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. आता शमीला पुनरागमन करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. आगामी होम सीजनसाठी शमीचा बंगालच्या ५० संभाव्य खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे तो पुन्हा एकदा ॲक्शनमध्ये दिसू शकतो.

दुखापतीतून सावरल्यानंतर शमीने वनडे संघात पुनरागमन केले, पण कसोटी संघात त्याला अजूनही पुनरागमन करता आलेले नाही. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेसाठी त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही.

येत्या २८ ऑगस्टपासून दुलीप ट्रॉफी स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत भारतातील एकापेक्षा एक स्टार खेळाडू खेळताना दिसतील. यात मोहम्मद शमी ईस्ट झोनकडून खेळताना दिसू शकतो. दुखापतीतून सावरल्यानंतर त्याने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत दमदार पुनरागमन केले होते. या स्पर्धेत भारतीय संघाने अंतिम फेरीत न्यूझीलंडला पराभूत करून जेतेपदाचा मान मिळवला होता.

# गॅरी सोबर्स यांचा विक्रम जडेजाच्या निशाण्यावर

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियमवर होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी टीम इंडिया सज्ज आहे. भारतीय अष्टपैलू रवींद्र जडेजा वेस्ट इंडिजचे आयकॉन सर गारफिल्ड सोबर्स यांच्याशी बरोबरी करण्यास केवळ ५८ धावांनी दूर आहे.

इंग्लंडविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत जडेजा उत्तम फॉर्ममध्ये आहे आणि त्याने आतापर्यंत सलग चार अर्धशतके झळकावली आहेत. लॉर्ड्स कसोटीच्या दुसऱ्या डावात जडेजा एकटाच उभा होता आणि त्याने ६१ धावांची नाबाद खेळी केली. आता ५८ धावा करताच तो एक नवा विक्रम करणार आहे.



वेस्ट इंडिजचा दिग्गज अष्टपैलू सोबर्स हा एकमेव फलंदाज आहे, ज्याने इंग्लंडमध्ये सहाव्या किंवा त्यापेक्षा कमी स्थानावर फलंदाजी करताना एक हजार धावा केल्या आहेत. सोबर्सने १६ डावांमध्ये ८४.३८च्या सरासरीने १०९७ धावा केल्या आहेत. यामध्ये चार शतके आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे, तर दुसऱ्या स्थानावर जडेजा आहे त्याने आतापर्यंत २७ डावांमध्ये ४०.९५च्या सरासरीने ९४२ कसोटी धावा केल्या आहेत. त्या खेळामध्ये एक शतक आणि सात अर्धशतकांचा समावेश आहे. इंग्लंडमध्ये एक हजार कसोटी धावा पूर्ण करण्यापासून आणि सोबर्सच्या एलिट यादीत दाखल होण्याची जडेजाला नामी संधी आहे.

रवींद्र जडेजा इंग्लंडमध्ये सहाव्या ते बाराव्या क्रमांकाच्या फलंदाजांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. गेल्या सलग चार डावांमध्ये अर्धशतकांसह जडेजा मालिकेत आतापर्यंत सर्वाधिक धावा करणारा पाचवा फलंदाज आहे. त्याने सहा डावांमध्ये १०९.००च्या सरासरीने ३२७ धावा केल्या आहेत आणि त्याची सर्वोत्तम धावसंख्या ८९ आहे.

# संघात अष्टपैलूसह प्रमुख गोलंदाज आवश्यक

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताचा संघ २-१ने पिछाडीवर आहे. त्यामुळे चौथा कसोटी सामना हा भारतीय संघाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असणार आहे. दरम्यान, या सामन्यासाठी अजिंक्य रहाणेने प्लेइंग ११ मध्ये कोणत्या ११ खेळाडूंना संधी द्यावी याबाबत मोलाचा सल्ला दिला आहे.



**चौथ्या कसोटीआधी अजिंक्य रहाणेचा टीम इंडियाला सल्ला**

भारत आणि इंग्लंड यांच्यात होणारा चौथा कसोटी सामना हा २३ जुलैपासून मँचेस्टरच्या मैदानावर रंगणार आहे. या सामन्याआधी अजिंक्य रहाणेने भारतीय संघाला अतिशय मोलाचा सल्ला दिला आहे. भारतीय संघाने या मालिकेत अष्टपैलू खेळाडूंना खेळवण्यावर अधिक भर दिला आहे, मात्र अष्टपैलू खेळाडूसह प्रमुख गोलंदाज संघात असणेही महत्त्वाचे असल्याचे अजिंक्य रहाणेने सांगितले आहे. भारतीय संघाकडून रवींद्र जडेजाने गेल्या दोन सामन्यात लागोपाठ चार अर्धशतके झळकावली आहेत. वॉशिंग्टन सुंदरनेही फलंदाजीत दमदार कामगिरी केली आहे, मात्र रवींद्र जडेजाला गोलंदाजीत आपली छाप सोडता आलेली नाही. तो फलंदाजी करतोय, पण गोलंदाजीचे काय? अजिंक्य रहाणेने सामना जिंकण्यासाठी २० गडी बाद करण्यावर अधिक भर दिला.

अजिंक्य रहाणेने आपल्या युट्यूब चॅनेलवर बोलताना म्हटले की, कसोटी क्रिकेटमध्ये चौथ्या आणि पाचव्या दिवशी फलंदाजी करणे कठीण असते हे सर्वांना माहीत आहे. इंग्लंडने तिसऱ्या कसोटीत दमदार गोलंदाजी केली. मला तरी हेच वाटते, भारतीय संघाकडे मोठी धावसंख्या उभारण्याची संधी होती. ही संधी भारताने गमावली. भारताने चौथ्या कसोटीत आणखी एक गोलंदाजाला संघात स्थान द्यावे, कारण २० गडी बाद करून सामना जिंकता येऊ शकतो.

# बीसीसीआयला ९,६४१ कोटींची विक्रमी कमाई



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल सुरू झाल्यापासून भारतीय क्रिकेट बोर्डाला (बीसीसीआय) सोन्याचे दिवस आले. बोर्डाने २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण ९,६४१.७ कोटी रुपये कमाई केली. ही आकडेवारी 'रेडीफ्यूजन'ने प्रसिद्ध केली. दरम्यान, ५९ टक्के कमाई ही एकट्या आयपीएल (५७६१ कोटी) स्पर्धेतून झाल्याचे अहवालात म्हटले आहे.

२००८मध्ये सुरू करण्यात आलेल्या आयपीएलमुळे बोर्डाला प्रचंड आर्थिक फायदा झाला, शिवाय जागतिक ओळख लाभली. लीगला सुरुवात झाली तेव्हा कोणी विचार केला नव्हता की, ही लीग जगातील सर्वांत मोठी क्रिकेट लीग बनेल. बीसीसीआयला जगातील सर्वांत श्रीमंत क्रिकेट बोर्ड बनविण्यात आयपीएलने मोलाची भूमिका बजावली आहे. सरलेल्या आर्थिक वर्षांत बिगर आयपीएल मीडिया राइट्समधूनदेखील बोर्डाला ३६१ कोटींचा नफा झाला.

आयपीएल सामन्यांचे प्रसारण करण्याचा अधिकार. सामन्यांचे थेट प्रक्षेपण आणि हायलाइट्सचे हक्क मीडिया राइट्स प्राप्त करणाऱ्या कंपनीला विकले जातात. यातून बीसीसीआयला सर्वाधिक रक्कम मिळते.

२००८ ला पहिल्या आयपीएलची टायटल स्पॉन्सरशिप किंमत केवळ ५० कोटी होती. २०२३ला हा आकडा ३०० कोटींहून अधिक झाला. टाटा आणि बीसीसीआय यांच्यात दोन वर्षांसाठी एकूण ३०० कोटींचा करार झाला आहे.

कोणताही नवीन संघ आयपीएलशी जुळतो तेव्हा त्यांना फ्रँचायझी शुल्क भरावे लागते. ही प्रक्रिया बोलीद्वारे पूर्ण केली जाते. त्यात वेगवेगळ्या कंपन्या किंवा ग्रुप संघ खरेदीसाठी बोली लावतात. २०२२ला गुजरात आणि लखनौ हे नवे संघ आयपीएलमध्ये दाखल होताच बोर्डाच्या खात्यात १२५०० कोटींची भर पडली होती.

### ३० हजार कोटी राखीव

*रेडीफ्यूजनचे व्यवस्थापकीय संचालक संदीप गोयल यांनी सांगितले की, बीसीसीआयकडे रणजी करंडक, दुलीप ट्रॉफी, सी. के. नायडू करंडक या स्थानिक स्पर्धांनादेखील व्यावसायिक स्वरूप देण्याची प्रचंड क्षमता आहे. यामुळे बिगर आयपीएल उत्पन्नात आणखी भर पडू शकेल. बोर्डाकडे सध्या ३० हजार कोटींचा राखीव निधी असून या रकमेतून बोर्डाला दरवर्षी एक हजार कोटींचे व्याज मिळते.*




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com